## नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३१ शनिवार, दि. ०५ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

# पेशवे स्वत:साठी नव्हे देशासाठी लढले!

## केंद्रीयमंत्री अमित शहा यांचे गौरवोद्गार; पुणे येथे बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याचे अनावरण

जनता आवाज वृत्तसेवा

**पुणे : श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी ४१ युद्ध केले आणि एकाही युद्धात पराभव होऊ दिला नाही. ते स्वत:साठी नाही तर देश आणि स्वराज्यासाठी लढत होते. ते स्वराज्याचे केवळ पंतप्रधान होते. त्यांच्यात इतका पराक्रम आणि एवढी मोठी शक्ती असताना देखील ते पेशवेच राहिले असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. इंग्रजांनी इतिहासाचे विकृतीकरण करण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र, ते यशस्वी झाले नसल्याचे शहा यांनी म्हटले आहे.**

पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथील थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळा अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रम ासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह कालच पुण्यात दाखल झाले होते. या वेळी ते बोलत होते.

श्रीमंत बाजीराव पेशवे यांना कोणी, ईश्वरदत्त सेनापती, अजिंक्य योद्धा, श्रीमंत बाजीराव पेशवे असे म्हणतात. त्या वेळी अनेक राजांनी विजय मिळवला होता. मात्र बाजीराव पेशवे ते स्वत:साठी लढले नाहीत. तर देश आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यासाठी लढले. त्यांचे प्रत्येक युद्ध हे मातृभूमीसाठी, धर्मासाठी आणि स्वराज्यासाठी होते. आपल्या



चाळीस वर्षाच्या जीवनात त्यांनी अमर इतिहास लिहिण्याचे काम केले. पुढील अनेक शतके ते कोणीही करू शकणार नसल्याचेही शहा यांनी म्हटले आहे.

पेशवा बाजीराव यांचे स्मारक बनवण्याची योग्य जागा ही एनडीए पुणे अकादमीच असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. देशातील तिन्ही सेनांचे आगामी काळातील सूत्रधार ज्या ठिकाणी प्रशिक्षित होऊन निघतात. त्या ठिकाणी बाजीराव पेशवे यांचा पुतळा उभारणे आणि त्यांच्या या मूर्ती पासून प्रेरणा घेऊन, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून आपल्या भविष्यातील सैनिक जाणार असतील तर अनेक वर्षापर्यंत भारतीय सीमा भागाला हात लावण्याचा कोणीही हिंमत होणार नाही. असा मला विश्वास असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे.

आजची युद्धाची परिस्थिती आणि बाजीराव पेशवे यांच्या काळातील युद्धाची पद्धती, यांच्यात काय साम्य असल्याचा प्रश्न विचारला जातो. मात्र, युद्ध कलेच्या पद्धतीत काही कला या कायम असतात. यामध्ये युद्धामधील व्यूव रचना, त्वरित निर्णय घेण्याची क्षमता, सम र्पण, देशभक्तीचा भाव आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बलिदानाचा भाव. हेच सैनिकांना विजय मिळवून देते. हत्यार बदलत राहतात मात्र, या सर्व गोष्टी कायम राहत असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे.

जनर मोंटॅगोमेरी हे दुसऱ्या महायुद्धातील निर्णायक युद्धाचे नायक ठरले. त्यांनी जभरातील योद्धांच्या संदर्भात लिहिलेल्या पुस्तकात पालखेडच्या लढाईचा उल्लेख केला. धोरणात्म कदृष्ट्या हे एक सर्वोत्तम युद्ध होते, असा उल्लेख त्यांनी थोरल्या बाजीराव पेशव्यांचा केला. पण काही ब्रिटिश व काही स्वदेशी इतिहासकारांनी मराठा साम्राज्यातील आमच्या अनेक नायकांवर घोर अन्याय केला. किंबहुना आपल्या हिंदवी स्वराज्याचा व मराठी साम्राज्याचा इतिहासच त्यांनी आपल्या इतिहासातून डिलीट करून टाकला. यामुळे आपल्याला वाटते की, मोगलानंतर थेट इंग्रजच इथे आले आणि त्यांनी आपल्यावर राज्य केले. यामुळे आपल्याला आपल्या महानायकांचा विसर पडला.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### उपमुख्यमंत्री शिंदेंकडून जय गुजरातचा नारा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशाच एका कार्यक्रम ात एकनाथ शिंदे यांनी देखील सहभाग घेतला. या दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी घोषणा करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भाषणादरम्यान एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय गुजरात असा नारा दिला.

# ..गुंडगिरी खपवून घेणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांचा मनसेला इशारा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : मराठी भाषेचा अभिमान असणे चुकीचे नाही, पण भाषेच्या नावाखाली गुंडगिरी खपवून घेणार नाही. भाषेवरुन वाद घालणाऱ्या, मारहाण करणाऱ्या आणि गुंडशाहीवर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेल्या वादाने आता मराठी विरुद्ध अमराठी असे रूप घेतले आहे. त्यातच मराठीत न बोलल्याने मीरारोड येथे एका दुकानदाराला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली होती. त्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध व्यावसायिक आणि केडियोनॉमिक्सचे संस्थापक सुशील केडिया यांनी मराठीप्रेमींना डिवचणारे विधान केले आहे.

मी मराठी शिकणार नाही, काय करायचं ते करा, असे केडिया यांनी एक्सवर शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये राज ठाकरे यांना टॅग करत म्हटले. या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. मीरा भायंदर येथील व्यापाऱ्यास मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. एखादा मराठी व्यापारी आसाममध्ये जाऊन भाषा शिकायला वेळ लागत असेल तर त्याला मारहाण करणार का, असा सवालही फडणवीसांनी उपस्थित केला. खरा अभिमान असेल तर मराठी भाषा शिकवा, क्लासेस घ्या, इंग्रजीला का मग गळे लावता. स्वत:च्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकायचे आणि मराठीसाठी गळा काढायचा, असे म्हणत ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्षपणे टीका केली.

भारतातील कोणत्याही भाषेवर अशा प्रकारे अन्याय केला जाऊ शकत नाही, हे देखील आपल्याला लक्षात घ्यावे लागेल. हे लोक इंग्रजीला जवळ करतात आणि हिंदीवरून वाद करतात. मग हा कोणता विचार आहे? त्यामुळे अशा प्रकारे जे लोक कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# विद्यार्थ्यांनी भरलेल्या बसचा अपघात

## चंदनापुरी घाटातील घटना; सुदैवाने जीवितहानी टळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पुणे-नाशिक म हामार्गावरील चंदनापुरी घाटात काल, शुक्रवारी सकाळी चंदनेश्वर विद्यालयाच्या स्कूल बसला भीषण अपघात होऊन चार ते पाच विद्यार्थी जखमी झाले. सुदैवाने, या अपघातात कोणतीही गंभीर जीवितहानी झाली नाही, मात्र यामुळे विद्यार्थ्यांच्या वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंदनेश्वर विद्यालयाची एम.एच. १४ बी.ए. ८९३२ क्रमांकाची बस साकुर आणि आसपासच्या भागातून सुमारे ३५ हून अधिक विद्यार्थ्यांना घेऊन चंदनापुरी घाटातून शाळेकडे येत होती. पुणे-नाशिक महाम ार्गावर सध्या सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामामुळे एकेरी वाहतूक सुरू आहे. याच दरम्यान, समोरून येणाऱ्या एका वाहनाने हुल दिल्याने चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्याच्या कडेला असलेल्या साईट गटारात पलटी झाली.



अपघाताची माहिती मि ळताच तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे, पोलीस हवालदार अमित महाजन आणि डोळासने महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने बचावकार्य सुरू करत जखमी विद्यार्थ्यांना चंदनापुरी घाटावरील गुंजाळ हॉस्पिटलम ध्ये उपचारासाठी दाखल केले. जखमी विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. पान ४

### आरटीओने बसेसची तपासणी करावी

सद्यस्थितीत अनेक स्कूल बसेसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरले जातात, तसेच वाहनांच्या देखभालीसंदर्भातही प्रश्नचिन्ह निर्माण होते. परिवहन विभागाने आणि आरटीओने विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या सर्व बसेसची कसून तपासणी करणे, त्या सुसज्ज आहेत की नाही? याची खात्री करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शिवरायांच्या विचारांवर चालणारे महायुती सरकार

## अक्षय कर्डिले; पाथर्डीतील मिरीत ४०० लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून सर्वसाम ान्य नागरिकांना तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये, म्हणून छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानाअंतर्गत शासन आपल्या दारी या अभियानाच्या माध्यमातून लागणारे सर्व दाखले, प्रमाणपत्र तसेच विविध योजनांची माहिती घरपोच देण्याचे काम केले जात असून खऱ्या अर्थाने राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचे सरकार कार्यरत असल्याचे प्रतिपादन भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केले आहे.



काल, दि. ४ जुलै रोजी पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे परिसरातील दहा-पंधरा गावातील सुमारे ४०० लाभार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत दाखले प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम कर्डिले यांच्या हस्ते पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक होते.

डॉ. नाईक तहसीलदार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानांतर्गत मिरी येथे महसूल, पंचायतराज, कृषी विभाग, वन विभाग, पान ४

राज्य सरकारने आणलेल्या योजनांचा लाभ सर्वसामान्य गरजूंपर्यंत पोहोचावा आणि या योजनांमधून गोरगरीब, विधवा, अपंग तसेच शालेय विद्यार्थी, लाडक्या बहिणी यांना मदत व्हावी. या हेतूने शासन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान प्रत्येक गावात राबवले जाणार असून या अभियानातून निश्चित गोरगरीब तसेच शालेय विद्यार्थी यांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे.

**– अक्षय कर्डिले, जिल्हाध्यक्ष**

# आ. जगतापांना धमकी देणारा पकडला?

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; आरोपीला तेलंगणातून घेतले ताब्यात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी गेल्या काही दिवसापासुन प्रखर हिदुत्ववादी भुमिका घेतली होती. त्यामुळे त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. या घटनेमुळे संपूर्ण जिल्हा पेटून उठला होता. मात्र काल (दि.४) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धमकी देणाऱ्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

आ. जगताप यांनी गेल्या काही दिवसापासुन प्रखर हिदुत्ववादी भुमिका घेतली होती. त्यामुळे नगर शहरातील वातावरण अक्षरश: ढवळुन निघाले होते. अक्कलकोट येथील हिंदुत्ववादी सभा त्यांनी चांगलीच गाजवली होती. अशातच पाथर्डी येथील जवळके येथील घटना तसेच नगर शहरात हिंदुत्ववादी संघटनांनी त्यांच्या समर्थनार्थ मोर्चाचे आयोजन केले होते. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर काही विकृत प्रवृत्तीच्या लोकांनी आ. जगताप यांना ठार मारण्याची धमकी दिली होती.

आ. जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्याच्या काल (दि.४) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. त्याला तेलंगणा येथून ताब्यात घेतले असल्याचे पोलीस सूत्रांकडून समजले आहे.

आ. जगताप यांचे खासगी स्वीय साहाय्यक सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेज करून आमदार संग्राम जगताप यांना दो दिन मे खत्म करुंगा अशी धमकी बुधवारी दिली होती. याबाबत सुहास शिरसाठ यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला होता.

या घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर हे करत असताना त्यांना मिळालेल्या माहितीनुसार अनिस शेख हा तेलंगणा येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले.

# अहिल्यानगरचे पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर

## श्रीरामपुरात अवैध वाळू वाहतूक करणारे पकडले ट्रॅक्टर; उपशावर छापा; १९ लाख ९० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील नायगाव परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध वाळू उपशावर मोठी कारवाई केली. सदर ठिकाणाहून पोलिसांनी १९ लाख ९० हजार रुपयाच्या मुद्देम ालासह चार आरोपी ताब्यात घेतले आहेत. या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ३ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांची माहिती काढत असताना, पथकास तालुक्यातील नायगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात दोन इसम ट्रॅक्टर ट्रॉलीमधून वाळू उपसा करून वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तात्काळ सदर ठिकाणी जावून पहाणी केली असता, दोन ट्रॅक्टर मजूरांच्या सहाय्याने वाळू भरताना मिळून आले आहे.

पथकाने छापा टाकून दोन ट्रॅक्टर चालक करण अशोक वाघ (वय २०, रा. नायगाव), अनिल नारायण आमले (वय २४, रा. गोंडेगाव) तसेच ट्रॅक्टर मालक दत्तात्रय रावसाहेब भवार (रा. गोंडेगाव), आदित्य काकासाहेब दिवे (रा. गोंधवणी, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर) यांना ताब्यात घेतले. वाळू वाहतूक व उपसाबाबतचा परवाना नसल्याने घटना स्थळावरुन १९ लाख ९० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह पान ४



### जिल्ह्यात अवैद्य व्यावसायिकांचे धाबे दणाणले

गेल्या काही दिवसांपासून जिल्हाभर परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी अवैद्य धंद्यांवर मोठी कारवाई केली होती, त्यामुळे अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले होते. त्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी मटका, मावा, जुगार, देशी-विदेशी दारू, त्याचबरोबर काळ्या काचा असलेल्या गाड्या अशा अनेक अवैध प्रकारांवर धडक कारवाया करून डीवायएसपी खाडे यांनी जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी केली. त्यातच काल श्रीरामपुरातही वाळू तस्करांवर धडक कारवाई करून पोलिसांनी मोठी कामगिरी केली आहे.

## संमिश्र

### धर्मशाळेत पहाटे एनआयएचा छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**धर्मशाळा** : राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) पथकाने शुक्रवारी पहाटे हिमाचल प्रदेशातील धर्मशाळा येथील नौरोजी रोडवरील वॉर्ड क्रमांक ४ मध्ये छापा टाकला. मॅकलिओडगंजमधील टेंपल रोडवरील ''सनी कम्युनिकेशन सेंटर'' चे मालक सनी यांच्या बँक खात्यांची आणि कागदपत्रांची कसून चौकशी केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुप्तचर संस्था गेल्या अनेक दिवसांपासून सनीवर लक्ष ठेवून होती. एनआयएची टीम पहाटे ४ वाजता चंदीगडहून धर्मशाळेत पोहोचली. त्यात १० ते १२ अधिकारी आहेत. सध्या तपास सुरू आहे आणि अधिकारी अद्याप या प्रकरणाबद्दल काहीही सांगत नाहीत.

### भाजप नेते जगन्नाथ प्रधान यांना अटक


**जनता आवाज वृत्तसेवा**

**भुवनेश्वर** : ओडिशातील भुवनेश्वर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांना मारहाण केल्याप्रकरणी भाजप नेते जगन्नाथ प्रधान यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी गुरुवारी संध्याकाळी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. या प्रकरणात आतापर्यंत ६ जणांना अटक करण्यात आली आहे. प्रधान म्हणाले, ''मी तपासात सहकार्य करण्यासाठी आलो आहे. जर माझ्या अटकेमुळे प्रकरण सुटले तर मी सहकार्य करण्यास तयार आहे.'' त्यांना आणि त्यांच्या पक्षाला बदनाम करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### अमरनाथ यात्रेत पहिल्या दिवशी १२,३४८ भाविकांनी घेतले दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पहलगाम** : गुरुवारी अमरनाथ यात्रा सुरू झाली. पहिल्या दिवशी संध्याकाळी ७:१५ वाजेपर्यंत १२,३४८ भाविकांनी पवित्र गुहेतील बर्फाच्या शिवलिंगाचे दर्शन घेतले. यामध्ये ९,१८१ पुरुष आणि २,२२३ महिलांचा समावेश होता. ९९ मुले, १२२ साधू, ७ साध्वी, ७०८ सुरक्षा कर्मचारी आणि ८ ट्रान्सजेंडर भाविक देखील दर्शनासाठी पोहोचले. कडक सुरक्षेत, ५,२०० हून अधिक यात्रेकरूंचा दुसरा गट गुरुवारी जम्मू बेस कॅम्पमधून निघाला आणि दुपारी २ वाजता पहलगाम बेस कॅम्पवर पोहोचला. दुसरा गट शुक्रवारी पहाटे ४ वाजता अमरनाथ गुहेकडे रवाना झाला. ३८ दिवसांची ही यात्रा पहलगाम आणि बालटाल दोन्ही म ार्गांवरून निघेल. ही यात्रा ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी संपेल.



# जवाहर विद्यालयात कृषीसह डॉक्टर दिन साजरा



## प्रगतशील शेतकरी व डॉक्टरांचा गौरव; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** चिंचपूर इजदे येथील जवाहर विद्यालयात कृषी दिन व राष्ट्रीय डॉक्टर दिन संयुक्तरीत्या साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रगतशील शेतकरी आणि डॉक्टरांचा सत्कार करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

शाळेतील मागील वर्षी विविध परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. मारुती दहिफळे, रामनाथ कराड, सरपंच पुष्पा मिसाळ, डॉ. राहुल वेलदे, मुख्याध्यापिका धनश्री शिरसाट, रवींद्र खेडकर, सुनील खेडकर हे उपस्थित होते.

> हरितक्रांतीचे जनक स्व. मुख्यमंत्री नाईक यांचे कार्य कृषीबरोबर उद्योग क्षेत्रात मोठे आहे. आजच्या काळात आधुनिक शेतीबरोबरच सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन याकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे. नाईक यांनी मोठे योगदान राज्यासाठी कृषी क्षेत्रात दिले त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन हा साजरा केला जात आहे.
>
> **– रामनाथ कराड**

प्रगतशील शेतकरी रावसाहेब खेडकर, त्रिंबक खेडकर, बाजीराव खेडकर, गोरक्ष खेडकर, बाबुराव लोखंडे, जालिंदर खेडकर, ज्ञानदेव खेडकर, देविदास खेडकर, बाबासाहेब दहिफळे, एकनाथ खेडकर, कुंडलिक खेडकर, गणेश खेडकर, देवेंद्र खेडकर, नाना पंडागळे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेखा माळवे, सविता बडे, भैय्या गायकवाड, सुभाष डोळे, उद्धव लोखंडे, वैभव खुटाळे, धनंजय घायाळ यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक निलेश फुंदे यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र खेडकर यांनी केले. तर आभार सुनील खेडकर यांनी मानले.

# जखमी विद्यार्थ्यांना माजी मंत्री थोरातांकडून मदत

## इंद्रजीत थोरात रुग्णालयामध्ये भेट देवून जखमी विद्यार्थ्यांची केली चौकशी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुका हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र आहे. ग्रामीण भागातही अत्यंत चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले असून चंदनेश्वर विद्यालयाची स्कूल बस विद्यार्थ्यांना घेऊन येत असताना घाटामध्ये सुरू असलेल्या एकेरी वाहतुकीमुळे ही स्कूलबस साईड गटारामध्ये पलटली यामध्ये चार-पाच विद्यार्थ्यांना जखमा झाल्या असून ही बातमी कळताच माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या यंत्रणा व कार्यकर्त्यांना तातडीने मदतीच्या सूचना दिल्या असून इंद्रजीत थोरात यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची अस्थिवायिकपणे चौकशी केली.

चंदनापुरी घाटातील डॉ. गुंजाळ हॉस्पिटल येथे या विद्यार्थ्यांना ॲडमिट करण्यात आले असून या विद्यार्थ्यांची थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत भाऊ थोरात विजय राहणे, इंद्रजीत खेमनर ,सरपंच भाऊराव रहाणे, बाळासाहेब सागर, किरण राहणे, बालमशेठ सरोदे ,आनंदराव कडणे, बाळू सरोदे, संदीप सरोदे, दिनकर भालेराव यांसह चंदनापुरी मधील विविध कार्यकर्त्यांनी भेट घेऊन चौकशी केली यावेळी मुख्याध्यापक त्याचप्रमाणे तालुका पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे यांसह विविध मान्यवर हजर होते.



> मुख्याध्यापक सर्व विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला. घटना दुर्दैवी असून जखमी झालेले विद्यार्थी यांच्यावर उपचार सुरु आहेत. पालकांनी व नागरिकांनी घाबरून जाऊ नये.
>
> **– इंद्रजीत थोरात**

काल सकाळी विद्यार्थ्यांना चंदनेश्वर विद्यालयात घेऊन येत असताना चंदनापुरी घाटामध्ये सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामामुळे एकेरी वाहतूक करण्यात आली आहे. समोरून येणाऱ्या वाहनाने हुल दिल्याने ही एमएच १४ बिए ८९३२ या क्रमांकाची स्कूल बस साईड गटारामध्ये गेली. यामुळे चार-पाच विद्यार्थ्यांना काही जखमा झाले आहेत मात्र कुणीही गंभीर जखमी नसल्याने काळजी करण्याचे कारण नाही.

स्कूलबसची बातमी कळताच माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपले सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना तातडीने या विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या. यानुसार यशोधन कार्यालयाचे प्रमुख तथा थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, विजय राहणे यांनी तातडीने घटनास्थळाला भेट दिली. यानंतर विद्यार्थी डॉ. राधेश्याम गुंजाळ हॉस्पिटल येथे ॲडमिट असून या विद्यार्थ्यांची आस्तेवाईकपणे चौकशी करून सर्वांना दिलासा दिला.

# वन विभागातील बदल्याप्रकरणी चौकशीचे आदेश

## प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक यांनी काढले पत्र; जनहितार्थ संघटनेच्या आंदोलनाला यश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्याच्या वन विभागातील अनियमिता, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, वन्य प्राण्यांच्या हत्येच्या चौकशीच्या मागणीसाठी जनहितार्थ जन आक्रोश संघटनेच्या वतीने नाशिक येथील प्रादेशिक मुख्य वनसंरक्षण कार्यालया समोर उपोषण करण्यात आले.

संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उपोषणाची दखल घेऊन प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले. या आंदोलनास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुण आंधळे व सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांनी पाठींबा दिला.

> **... या आश्वासनांमुळे आंदोलन स्थगित**
>
> विभागीय कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी अहिल्यानगर, पारनेर, टाकळी ढोकेश्वर, तिसगाव व राहुरी यांच्या कार्यालयाबाबत असणाऱ्या तक्रारीची माहिती देण्यात यावी व टाकळी ढोकेश्वर वनपरिक्षेत्रातील गारगोटी उत्खनन व झाडे तोडीच्या घटना घडल्याच्या तक्रारीची दखल घेऊन अति तात्काळ चौकशी करण्याचे लेखी आदेश देऊन तात्काळ अहवाल मागविला आहे. हे लेखी पत्र संबंधित विभागाकडून मिळाल्याने उपोषण मागे घेण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे, बाबासाहेब डोळस, बबनराव झरेकर, विजय सासवडे, हरेश्वर साळवे, जेष्ठ महिला शांताबाई आंबेडकर आदी उपस्थित होते. प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन यांनी उप वनसंरक्षक अहिल्यानगर यांना पत्र देऊन वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील शिकार प्रकरणांमध्ये न्यायालयात तात्काळ चार्जशीट दाखल करावे, वनपरिक्षेत्र अधिकारी टाकळी ढोकेश्वर यांच्या कार्यालयात जाणे-येणे करिता शेतकऱ्यांना, जेष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिकांना त्रास होत असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी चांगला रस्ता उपलब्ध करून द्यावा.

# ...त्यांनी आ. जगतापांना टार्गेट केले म्हणून उत्तर दिले : बनसोडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आजपर्यंत काही जन जय भीम-जय मिम घोषणा देत होते. तर आम्ही जय शिवराय-जय भीम-जय श्रीराम घोषणा दिली तर बिघडले. आम्ही काही धर्म बदलला नाही फक्त आ. संग्राम जगताप यांना काही जिहादी टार्गेट करू राहिले, म्हणून आम्ही त्यांना उत्तर दिले, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते,दलित चळवळीतील नेते सुरेश बनसोडे यांनी केले.



शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ व हिंदुत्ववाची बुलंद तोफ राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी आ. संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाज व हिंदूवादी संघटनेच्या वतीने आयोजित सभेत जिहाद्यांविरुद्ध घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार चर्चा आहे. बनसोडे यांचा सन्मान तोफखाना मित्रमंडळ अहिल्यानगर यांनी केला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी दीपक सूळ, सूरज जाधव, सारंग पंधाढे, अभिजित चिप्पा, अक्षय अडपे, चेतन अरकन, निखिल कांबळे, ओम पुंड, अंकुश मोहिते, सिद्धार्थ आढाव, समिर भिंगारदिवे, यश पंधाडे, बबलू सुपेकर, अक्षय डाके, भैय्या मुंडलिक, ओम कांबळे आदी उपस्थित होते.

## सोनेवाडी परिसरात बिबट्या जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर शहर परिसरात तसेच तालुक्यात बिबट्यांचा वावर वाढला आहे. शुक्रवारी सोनेवाडीत एक बिबट्या जेरबंद करण्यात यश आले आहे.

# ‘प्रवरा’च्या शिबीरात २५० रुग्णांवर औषधोपचार

## प्रवरा ग्रामीण आरोग्य केंद्र सुरू करून रुग्णांना दिलासा : गीते



**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** प्रवरा मेडिकल ट्रस्ट ग्रामपंचायत पिंप्री लौकी अजमपुर जनसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सर्व रोग निदान शिबिरामध्ये २५० रुग्णांची विविध आजारांची तपासणी करून औषध उपचार करण्यात आले.

सर्व रोग निदान शिबिराचे उद्घाटन सरपंच संगीता भारतराव गीते यांनी केले. शिबिराप्रसंगी भाऊसाहेब लावरे, प्रा. कान्हु गिते, भाऊसाहेब मुंढे, रामदास दातीर, संजय बिडवे, कैलास खेडकर, मेजर सुनिल गिते, विजय कदम, तान्हाजी गिते, लक्ष्मण गिते, भास्करराव दातीर, सोशल वर्कर, आव्हाड गणपत, नाना गिते, रमेशराव कदम, विजय कदम, डॉ. आहेर यासह ग्रामस्थ संख्येने उपस्थित होते.

> **शिबिरामध्ये २५० रुग्णांची तपासणी**
>
> जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सर्व रोग निदान शिबिरामध्ये २५० रुग्णांची तपासणी करून विविध आजारावर उपचार करण्यात आले. तर ४० गंभीर आजार असणाऱ्या रुग्णांना प्रवरा हॉस्पिटलच्या माध्यमातून डमिट करण्यात आले व त्यांना मोफत उपचार देण्यात आले.

> रुग्णसेवा ही ईश्वर सेवा असून ती खऱ्या अर्थाने विखे परिवारांनी केल्यामुळे एक मोठा पुण्याचे काम त्यांच्या हातून घडत आहे. आपल्या गावात भविष्यकाळात ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून विविध सेवा उपलब्ध करण्याचा मानस आहे. दरवर्षी विविध प्रकारचे सर्व रोग निदान शिबिर घेवून ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर यांना मोठा दिलासा देणार आहे.
>
> **– भारतराव गीते**

जनसेवा मंडळाचे अध्यक्ष भारतराव गीते म्हणाले की, ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील महिला, वृद्ध व बालकांना आरोग्याच्या सुविधा मिळण्याची मोठी अडचण होत होती.

मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पाटील विखे यांच्या प्रयत्नाने पिंपरी गावामध्ये प्रवरा ग्रामीण आरोग्य केंद्र सुरू करून रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. हे रुग्णालय गावातील ग्रामस्थांना मोठे वरदान ठरले.

## डॉ. सुजय विखेंसह आ. कर्डिलेंची हजेरी; हजारो भाविक येणार उपवास सोडायला

# अरणगाव येथे ७ जुलै द्वादशीला रथयात्रा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आषाडी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग नगरजवळील अरणगाव (मेहराबाद) येथील श्री संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात येतात अशी आख्यायिका आहे. त्यामुळे येथे दरवर्षी मोठा उत्सव होत असतो, परिसरातील व नगरमधील सुमारे २५ हजार भाविक येथे दरवर्षी उपवास सोडण्यासाठी येतात. तर देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशीनिम्मित द्वादशीच्या दिवशी गावातून रथयात्रा काढण्यात येते.



संतांची पावनभूमी असलेल्या अरणगांव येथे श्री संत बुवाजीबुवा महाराज व अवतार मेहेरबाबा यांच्या संजीवन समाधी असलेल्या पुण्यभूमीत आषाढी सप्ताह, अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ झाला आहे.

दैनंदिन कार्यक्रम सुरु झाले असून दररोज काकडा भजन, विष्णु सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरिपाठ आरती, कीर्तनानंतर गावोगावीचे जागर होतो. रात्री अमोल महाराज सातपुते, मनोहर महाराज शिनारे, योगेश महाराज खेंडके यांचे कीर्तन झाले. असून भगवान महाराज मचे, डॉ. राधाकृष्ण महाराज अकोलकर, लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांचे कीर्तन होणार आहे.

दि.६ जुलै रोजी पहाटे ५.३० वाजता अभिषेक व एकादशी महापूजा खा. निलेश लंके, सरपंच पोपट पुंड यांच्या हस्ते एकादशी पूजा होणार आहे. दि. ७ जुलै रोजी पहाटे ५.३० वाजता महापुजा द्वादशीला माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, जेष्ठ नेते भानुदास कोतकर, स्वाती कार्ले, बाळु दळवी यांचे हस्ते होणार आहे.

तर दुपारी रथयात्रा मिरवणूक पूजा मा. खा. डॉ. सुजय विख, आ. काशीनाथ दाते, आ. संग्राम जगताप, संदेश कार्ले, सुवर्णाताई कोतकर, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, मनोज कोतकर, सरपंच पोपट पुंड, स्वाती भाऊसाहेब शिंदे, श्रीधर केळकर, मेहेरनाथ कलचुरी, जाल पी दस्तुर, रमेश जंगले, राजु प्रसाद, नवनाथ गहीले, नाना करांडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बालपण स्कुलच्या अनोख्या दिंडीचे कौतुक

## वारीमुळे लहान मुलांवर आध्यात्मिक आणि नैतिक संस्कार : रविंद्र दातीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** वारीमुळे लहान मुलांवर चांगले आध्यात्मिक आणि नैतिक संस्कार होतात. वारीमध्ये सहभागी होऊन, मुलांमध्ये श्रद्धा, भक्ती, आणि समाजासाठी काहीतरी करण्याची भावना वाढीस लागते, असे उद्गगार गावचे सरपंच रविंद्र दातीर यांनी काढले.

संगमनेर तालुक्यातील बालपण स्कूल पानोडी यांनी दिंडीद्वारे मोबाईलचे दुष्परिणाम, बळीराजाची कथा, सर्वधर्मसमभाव शिक्षणाचे महत्व, झाडांचे महत्त्व, पर्यावरणतून गावोगावी समाज प्रबोधन यापसंगी खांबे येथील आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सरपंच दातीर म्हणाले की, वारीमध्ये मुलांचा देवाशी आणि वारकऱ्यांशी संबंध येतो. ज्यामुळे त्यांच्यामध्ये आध्यात्मिक जाणीव जागृत होते. वारीमध्ये मुलांचे समाजात आणि निसर्गाशी संबंध येतात. ज्यामुळे त्यांच्यामध्ये नैतिकता, समजूतदारपणा आणि सहानुभूती वाटते.



> दिंडी सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती व परंपरेची जाणीव होते आणि त्यांच्यामध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम व पथनाट्य सादर करत या पथनाट्याच्या माध्यमातून मोबाईलचे दुष्परिणाम, बळीराजाची कहाणी, सर्वधर्मसमभाव शिक्षणाचे महत्त्व, झाडांचे महत्त्व असे वेगवेगळे विषय गावकऱ्यांसमोर मांडून समाजप्रबोधनाचे काम करण्यात आले.
>
> **– सोनाली मुंढे, संचालक बालपण स्कूल**

‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’ आणि ’विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल’च्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. पारंपारिक वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांकडे टाळ होते. तसेच विद्यार्थिनींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते.

## श्रीराम विद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील श्रीराम माध्यमिक विद्यालयातील १० वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच शालेय साहित्याचे वाटप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाचे आयोजन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था यांच्या वतीने करण्यात आले होते. इयत्ता १० वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

# भानुदास कोतकरांकडून मंदिर समितीकडे वाहन सुपूर्द

## संदीप उद्योग समूहाची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला इलेक्ट्रिक वाहन भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त भाविकांच्या सोयीसाठी संदीप उद्योग समूहाच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला (पंढरपूर) एक अत्याधुनिक इलेक्ट्रिक वाहन भेट देण्यात आले. वारीत दर्शनासाठी आलेल्या वृद्ध, दिव्यांग, अपंग, लहान मुले आणि महिलांसाठी हे इलेक्ट्रिक वाहन उपयुक्त ठरणार आहे.

हे वाहन संदीप उद्योग समूहाचे संस्थापक तथा ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्या हस्ते मंदिर समितीकडे सुपूर्द करण्यात आले.



यावेळी माजी महापौर संदीप कोतकर, उपमहापौर सुवर्णाताई कोतकर, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सुप्रियाताई कोतकर, उद्योजक अमोल कोतकर, देवस्थानचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, पंढरपूर नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाठ, देवस्थानचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, नगरसेवक विक्रम शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

> वारी म्हणजे भक्ती, समर्पण आणि सेवा यांचं प्रतीक आहे. या वारीत हजारो वारकरी व भाविक सहभागी होतात. त्यामध्ये वृद्ध, दिव्यांग, अपंग, लहान मुले व महिलांची मोठी संख्या असते. त्यांना मंदिराच्या परिसरात सुरक्षित आणि आरामदायक वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहन अत्यंत उपयुक्त ठरेल. सेवा हीच खरी पूजा आहे, या भावनेतून आम्ही हा उपक्रम राबवला आहे.
>
> **– भानुदास कोतकर**

देवस्थानचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी संदीप उद्योग समूहाने दिलेले हे इलेक्ट्रिक वाहन भाविकांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे सांगून या उपक्रमाचे कौतुक करून आभार व्यक्त केले.

# मार्केटयार्डमधील चोरी करणारे गजाआड

## दोघांना केले गजाआड; एक जण झाला पसार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगरच्या मार्केट यार्डमधील भुसार विभागातील ८ दुकाने फोडून चोरी करणारे दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहेत, तर त्यांचा एक साथीदार पसार झाला आहे. या चोरट्यांकडून मार्केटयार्डसह नगर तालुक्यातील साकत व देहरे गावात मेडिकल दुकानांत केलेल्या चोऱ्याही उघड झाल्या आहेत. अकबर लुकमान खान (वय ३३, रा. दौला वडगाव, ता. आष्टी, जि. बीड), आर्यन पप्पु शेख (वय १९, रा. दौलावडगाव, ता. आष्टी, जि. बीड) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. तर समीर बालम शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) हा फरार झाला आहे.

मार्केट यार्डमधील भुसार विभागातील ८ दुकाने २ जुलै रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी फोडून चोरी केली होती. याबाबत संजय चुनिलाल लुनिया (वय ६१, रा. आनंदधाम, अहिल्यानगर) यांच्या फिर्यादी वरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस अधिक्षक सोम नाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. दिनेश आहेर यांनी पोलीस अंमलदार बापुसाहेब फोलाणे, संदीप पवार, शाहीद शेख, मयुर गायकवाड, रविंद्र घुंगासे, फुरकान शेख, प्रशांत राठोड महादेव भांड यांचे पथक नेमून समांतरतपास सुरु केला होता.

सदर पथक गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सदर गुन्ह्याचा तपास करत असताना ३ जुलै रोजी त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अकबर लुकम ान खान व त्याचे साथीदारांनी केला असून ते मोटारसायकलवर राधाबाई काळे महिला महाविदयालय परिसरात येणार आहेत. ही माहिती मिळताच पथकाने तात्काळ नमूद ठिकाणी सापळा रचुन संशयीत आरोपीचा शोध घेत असताना संशयीत आरोपी अकबर लुकमान खान व आर्यन पप्पु शेखयांना पकडले तर समीर बालम शेख हा पसार झाला.

### आणखी गुन्हे उघड होणार

ताब्यातील आरोपींकडे कसून चौकशी त केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने दिलेल्या माहितीवरून ३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींना पुढील तपासासाठी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपींनी आणखी काही गुन्हे केल्याची शक्यता आहे. पोलिस तपासात या बाबी उघड होण्याची शक्यता आहे.



# एमबीएच्या आठ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : पायरेन्सच्या 'एमबीए'च्या आठ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली असल्याची माहिती संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी दिली.

पायरेन्स आयबीएमएच्या एमबीए विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने व आत्मविश्वासाने करिअरच्या जगात भक्कम पाऊल ठेवले आहे. विविध नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वीरित्या निवड होऊन संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांना व्यवसायिक जगात प्रवेश मिळवून देण्यासाठी पायरेन्स एमबीए विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. असल्याचे तांबोळी यांनी सांगितले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये निकिता अरणे, प्राजक्ता कदम, राजेश खामकर, प्रणाली लिहीणार, वैभव लोखंडे, तुषार राजभोय, ऋतुजा सातपुते, ऋषिकेश शिंदे, यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे विखे पाटील , डॉ. निलेश बनकर सचिव पायरेन्स, आणि आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी अभिनंदन केले आहे.

# राजकारण करताना गरीबांचा विचार करा

## विश्वनाथ कोरडे; निघोज येथे रक्तदान शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : समाजकारण, राजकारण करताना समाजातील गरीब घटकांचा विचार करावा, जेणेकरून त्याला महत्व प्राप्त होते, आवाहन वजा माहिती भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केले.



पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती व माजी सरपंच दिवंगत संदीप वराळ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने निघोज येथे भव्य रक्तदान शिबिराचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला राळेगण थेरपाळ चे सरपंच पंकज कारखिले, सुभाष दुधाडे, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष अतुल माने, पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर, खरेदी विक्री संघाचे संचालक संग्राम पावडे, निघोजच्या सरपंच चित्रा वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, असलम इनामदार, अशोक ढवळे, निलेश घोडे, सुनिल उचाळे, विलास हारदे, अप्पा वराळ, भीमराव लामखडे, बाबाजी लंके, बाबाजी लंके, बजरंग वराळ, मनोहर राऊत, असलम इनामदार उपस्थित होते.

भाजपाचे पारनेर, सुपा मंडलाचे अध्यक्ष राहूल शिंदे म्हणाले की, संदीप पाटीलांचा विकासाचा संकल्प सचिन पाटलांनी सर्वांना बरोबर घेऊन चालविला आहे. संदीप पाटलांची आठवण आम्हांला सातत्याने येते. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने भरवलेले हे रक्तदान शिबीर स्तुत्य उपक्रम आहे.

कार्यक्रमाचे आयोजक व संदीप पाटील जनसेवा फाऊन्डेशनचे अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी बंधू संदीप वराळ पाटील यांच्या बद्दल आठवणी सांगत त्यांनी गोर गरीबांसाठी दिवाळी भेट व इतर योजनांच्या बद्दल उपस्थितांना माहिती दिली. मानले .


# मिनिमम बॅलन्स ठेवण्याची अट रद्द

## बँक ग्राहकांना मिळणार मोठा दिलासा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पूर्वी बँक ग्राहकांनी खात्यात मिनिमम बॅलन्स न ठेवल्यास दंड आकारला जात होता. परंतु आता इंडियन बँक, एसबीआय बँक, कॅनरा बँक यांनी सेव्हिंग खात्यांवरील मिनिमम बॅलन्स ठेवण्याची अट रद्द केली आहे. यामुळे सेविंग अकाउंट असणाऱ्या लाखो ग्राहकांना याचा फायदा होणार आहे.

बँक ग्राहकांनी खात्यात मिनिमम बॅलन्स न ठेवल्यास त्यांच्याकडून कोणताही दंड आकारला जाणार नाही. या निर्णयामुळे बँकिंग व्यवहार अधिक सुलभ, ग्राहकाभिमुख आणि पारदर्शक होणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.



बचत खात्यात ठरावीक किमान शिल्लक ठेवणं बऱ्याच बँकांसाठी आवश्यक असतं. जर खात्यात हा किमान बॅलन्स नसेल, तर बँका दंड आकारतात. मात्र, आता देशातील चार मोठ्या बँकांनी हा नियम हटवून खातेदारांना दिलासा दिला आहे. म्हणजेच, आता खात्यात मिनिमम बॅलन्स न ठेवल्यास कुठलाही दंड द्यावा लागणार नाही.

### या दिवसापासुन नियम होणार लागू

देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाने २०२० मध्येच आपल्या सर्व बचत खात्यांवरील मिनिमम बॅलन्सची अट रद्द केली होती. इंडियन बँकेने आपल्या सर्व प्रकारच्या सेव्हिंग्स अकाउंट खातेदारांना ७ जुलै पासून हे नवीन नियम लागू होतील. कॅनरा बँक ग्राहकांसाठी हा मिनिमम बॅलन्स रद्दचा निर्णय मे २०२५ मध्ये घेतला आहे. त्यांनी रेग्युलर सेव्हिंग्स, सॅलरी आणि एनआरआय सेव्हिंग्स अशा सर्व खात्यांवरील मिनिमम बॅलन्सची अट हटवली आहे. पंजाब नॅशनल बँकेनेही जाहीर केलं आहे की, सर्व सेव्हिंग्स खात्यांवर मिनिमम बॅलन्स न ठेवल्यास कोणताही दंड आकारला जाणार नाही.

# कामगारांच्या हॉस्पिटलचा प्रश्न मार्गी लावावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील एमआयडीसी मधील कामगार हॉस्पिटलचा प्रश्न राज्य शासनाकडे अनेक वर्षांपासून धुळखात पडून आहे. तो मार्गी लावण्यासाठी उद्योग मंत्री



उदय सावंत यांची शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले यांनी भेट घेवून निवेदन देत चर्चा केली.

नगर एमआयडीसी हजारो कामगार काम करत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणे गरजेचे आहे. दर महिन्याला कामगारांच्या

### उद्योग मंत्री सावंत यांची टायरवाल्यांनी घेतली भेट

पगारातून तीनशे रुपये कपात होत असतात. त्यांच्या हक्काचे हॉस्पिटल एमआयडीसी येथे उपलब्ध होणे गरजेचे आहे. कंपनीमध्ये एखादी अनुचित घटना घडत असते, अशावेळी त्यांना तातडीने उपचार मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचा जीव वाचू शकतो. अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. कामगार हा देशाच्या जडणघडणीमधील महत्त्वाचा घटक आहे. अहिल्यानगर एमआयडीसी येथे कामगार हॉस्पिटल लवकरात लवकर करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले यांनी दिली.

टायरवाले म्हणाले, अहिल्यानगर एमआयडीसी मध्ये मोठ्या प्रमाणात छोटे-मोठे उद्योग असुन माल वाहतुक करण्यासाठी विविध राज्यातून मालट्रक या ठिकाणी येत असतात.त्यांना वाहनतळ उपलब्ध नसल्यामुळे रस्त्याच्या कडेलाच गाड्या लावल्या जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. तसेच छोटे-मोठे अपधात दररोज होत असतात तरी एम आयडीसीमध्ये मालवाहतूक गाळ्यांना उभे राहण्यासाठी वाहनतळ निर्माण करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.

# देशी-विदेशी दारू साठ्यावर पोलिसांचा छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शेवगाव तालुक्यातील मुंगी गावामध्ये अवैधरित्या साठवलेल्या देशी विदेशी दारूच्या साठ्यावर शेवगाव पोलिसांनी छापा मारत ३० हजार २२० रुपये किमतीचा देशी विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे.



शेवगाव पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गुप्त माहिती मिळाली की, मुंगी या गावी एका इसमाने बंद घराच्या आडोशाला देशी-विदेशी दारूचा साठा करून त्याची विक्री केली जात आहे. नमूद माहितीच्या आधारे तपास पथक तयार करून छापा टाकला असता देवेंद्र मुगाजी सोनटक्के याला ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीकडून विविध कंपन्याची सुमारे ३९ हजार २२० रुपये किंमतीची देशी- विदेशी दारू जप्त करण्यात आली.

देवेंद्र सोनटक्के यांच्या विरोधात शेवगाव पोलीस स्टेशनचे पो. कॉ. अंबादास एकनाथ गडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला.

सदरची कारवाई शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या म ार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाजीराव सानप, पो. कॉ. चंद्रकांत कुसारे, ईश्वर गर्न, श्याम गुंजाळ, भगवान सानप, एकनाथ गर्कळ, प्रशांत आंधळे, ईश्वर बेरड, यांच्या पथकाने केली.

# पिंपळगाव माळवीच्या शेतकऱ्यांना मिळाला रस्ता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पिंपळगाव माळवी येथील शेतकऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक असलेला रस्ता गेल्या चार वर्षापासून प्रलंबित होता. तेथील शेतकरी म हादेव भोसले, गोरक्षनाथ भोसले आर्दीना शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने शेत जमीन पडीक होती. तहसीलदार संजय शिंदे यांच्याकडे अर्ज करून रस्त्याची मागणीचा पाठपुरावा केला व तहसीलदारांनी सकारात्मक भूमिका घेत शेतकऱ्यांच्या बाजूने शेतातून जाण्यासाठी रस्ता खुला करण्याचे आदेश दिले. मात्र वादीने उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे अपील



केली असता निर्णय वादींच्या विरोधात गेला व रस्ता खुला करण्याचे आदेश देण्यात आले.

कृषी दिनाचे औचित्य साधून सावेडी मंडळ अधिकारी शैलजा देवकाते यांच्या प्रम ुख उपस्थितीत रस्ता खुला करण्यात आला. यावेळी महादेव भोसले, गोरक्षनाथ भोसले, भगवान भोंदे, नारायण गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते गोरख आढाव, निर्मला भोंदे, तलाठी सागर ठोंबरे, तलाठी नितिन काळे, कोतवाल दळवी मॅडम, सागर भोंदे, शुभम भोंदे, दादासाहेब भोंदे, रेणुबाई भोंदे आदीसह पोलीस व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसीलदार संजय शिंदे यांच्या वतीने सावेडी मंडळ अधिकारी शैलजा देवकाते यांच्या पुढाकाराने चार वर्षापासून बंद असलेला शेतकऱ्यांना शेतीत जाण्यासाठीचा रस्ता खुला करून देऊन रस्त्याचे कामाचे शुभारंभ देखील करण्यात आले व ग्राम स्थांनी सावेडी मंडळ अधिकारी शैलजा देवकाते यांचा सत्कार केला.

# मोकाट जनावरांचा वेळीच बंदोबस्त करावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील मोकाट जनावरे तसेच कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुदर्शन शितोळे यांनी नगरपरिषदेकडे केली आहे.

शितोळे म्हणाले, सध्या सोशल मिडीयावर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. तो कुठला आहे याची माहिती नाही. परंतू त्यात एक आई आपल्या मुलांना शाळेत घेवून जाताना दिसते. गायांच्या जवळून जात असताना अचानकपणे एक गाय मागे वळते आणि दप्तरासह शाळकरी मुलीला शिंगाने उचलून घेवून खाली आपटते दिसत आहे.

सध्या मुलांच्या शाळा सुरु



झालेल्या आहेत. रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरे फिरतांना दिसतात. या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. या व्हिडीओवरुन पालकांनीही आपल्या मुलांना कसे सुरक्षित ठेवता येईल, याची काळजी घेण्याची गरज आहे.

या मोकाट जनावरांचा वेळीच योग्य तो बंदोबस्त करावा अशी मागणी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुदर्शन शितोळे, शहराध्यक्ष मंगेळ छतवाणी, जिल्हाध्यक्ष विजय जगताप, जिल्हा कार्याध्यक्ष चिलीया तुवर, प्रदेश संघटक मनोहर बागुल, उपशहराध्यक्ष पी. एम. पवार, शेतकरी महाआघाडी प्रमुख जी. एम. क्षीरसागर, राहुरी तालुकाध्यक्ष प्रसाद गाढे, जिल्हा सरचिटणीस वसंत गायकवाड, जिल्हा संघटक सोपानराव पागिरे, शिवाजी फोफसे, अविनाश कणगरे, कोपरगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र जाधव, राहाता संघटक दत्तात्रय मंडलिक, राहाता तालुकाध्यक्ष रामदास सदाफळ, राहाता शहराध्यक्ष जयराम क्षीरसागर, गुरु भुसाळ, सोमनाथ जगताप, जिल्हा संपर्क प्रमुख सुभाष यादव, बाळासाहेब जाधव, राजेंद्र पारधी आदिंनी केली आहे.

# ५ लाख भाविकांनी घेतला वडापावचा आस्वाद

## खा. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या महाप्रसादाला उदंड प्रतिसाद

दि. २ ते ४ जुलै दरम्यान पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या भाविकांसाठी खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा संघटनेच्या वतीने आयोजित विशेष महाप्रसाद उपक्रमास वारकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. तीन दिवसांत तब्बल ३ लाख ५० हजार भाविकांनी वडापाव, भजी, चहाचा आस्वाद घेतला.

सुरूवातीला २ लाख भाविकांसाठी वडापाव, भजीपाव, चहा, बिस्किटे, केळी व पाणी बाटली यांचे नियोजन होते. मात्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने केवळ तीन दिवसांत ३.५ लाख वडापाव, हजारो लिटर चहा व टनामध्ये फळे आणि पाण्याच्या बाटल्या भाविकांच्या सेवेत अर्पण करण्यात आल्या. पहिल्याच दिवशी सुमारे एक लाख वारकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दुसऱ्या दिवशी ही संख्या अधिक वाढली. शेवटच्या दिवशी तर अनेक



दिंडया थांबून महाप्रसादासाठी रांगेत उभ्या होत्या.

परिते येथे उभारण्यात आलेल्या या सेवेच्या मंडपात फक्त नास्ताच नाही तर आरोग्य सेवाही दिली जात होती. विशेष म्हणजे कोणत्याही राजकीय किंवा प्रचाराच्या गोंधळाविना ही सेवा पूर्ण भक्तिभवाने, शिस्तबध्द आणि आत्मीयतेने केली जात होती. आरोग्य तपासणी स्टॉलवर थकलेल्या वारकऱ्यांची प्राथमिक तपासणी, पायदुखीवर उपचार आणि औषधांचे वाटप करण्यात येत होते. वडापाव भजीपाव स्टॉलवर अधिच चवदार पर्याय झणझणीत मिरचीसह उपलब्ध होता. सुंठ, विलायची मिश्रीत गरमागरम चहा वारकऱ्यांना सुखावणारा होता. तर फळे पाणी बाटलीबंद पाणी सोबत घेऊन जात प्रत्येक वारकरी या महाभोजन यज्ञाचे कौतुक करत होता.

वारीला येणारा वारकरी म्हणजे कष्टकरी शेतकरी. त्याच्या पायावर हात ठेवून सेवा केली तर पांडूरंग भेटतो. मंदिरात फुले वाहत असताना जर माणसातला देव न दिसला तर ती पूजा अपूर्णच राहते. इथे कोणी कार्यकर्ता नाही. सर्व माझे जीवाभावाचे भाऊ आहेत. मी स्वतः हाती झाडू घेतो, साफ सफाई करतो. इथे फोटोसाठी सेवा करत नाही, इथे घाम गळेपर्यंत काम करणारे हात असतात.

**खासदार नीलेश लंके, लोकसभा सदस्य**

# संतोष खाडे यांचे मोहटादेवी दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी श्रीक्षेत्र मोहटादेवी येथे दर्शनासाठी भेट दिली. दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, मोहटादेवीचे दर्शन घेतल्यावर आत्मिक समाधान आणि मनाला शांती लाभते. मंदिर परिसर स्वच्छ आणि सुंदर असून येथे आल्यावर मन प्रसन्न होते.या वेळी श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे यांच्या वतीने खाडे यांचा सत्कार करण्यात आला.



हा सत्कार ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांच्या हस्ते पार पडला.या प्रसंगी जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, मुख्य लेखापाल संदीप घुले, शिवाजी पालवे आदी मान्यवर उपस्थित होते. या भेटीद्वारे खाडे यांनी स्थानिक भाविकांशी संवाद साधला तसेच देवस्थानच्या व्यवस्थापनाबद्दल समाधान व्यक्त केले.मोहटादेवी मंदिर हे श्रद्धेचे केंद्र असून दरवर्षी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. येथे असलेली स्वच्छता, व्यवस्थापन आणि आध्यात्मिक वातावरण याबद्दल खाडे यांनी कौतुक केले.

# संपादकीय

## फेक विश्वात वावरताना...

स्वतःचे खोटे प्रोफाइल ठेवून नोकरी, विवाह, प्रवास, व्यापार किंवा मैत्रीच्याही निमित्ताने लोकांना जाळ्यात ओढणे आणि पैशांच्या बाबतीत किंवा वैयक्तिक पातळीवरील इतर गोष्टींमध्ये ठकवणे हा एक मोठा व्यवसाय बनला आहे. याचीच पुढील आवृत्ती म्हणजे फेक न्यूज. अशा बातम्या कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. राजकारण आणि अर्थकारणापासून 'आज पृथ्वीवर सूर्याकडून कॉस्मिक रेजचा मारा होणार आहे तरी सावध राहावे'पर्यंत यामध्ये काहीही असू शकते. अशा बातम्यांना मसाला व्हॅल्यू असल्याने सोशल मीडियावर त्या झपाट्याने पसरतात. याचीच पुढची पायरी म्हणजे फेक व्हिडीओ. समाजमाध्यमांमार्फत 'व्हायरल' झालेल्या फोटो किंवा व्हीडिओवरून गैरसमज होऊन भांडणे, हिंसाचार, कोर्ट केसेस आणि अगदी दंगली उद्भवणे आता नवीन राहिलेले नाही. आपण पाहिलेला फोटो किंवा व्हीडिओ अस्सल आहे की मॉर्फिंग केलेला म्हणजे संगणकीय साधने वापरून सोयीस्कररीत्या कट-पेस्ट केलेला आहे, याची खात्री न करताच पाठिंबा किंवा विरोध करण्याच्या हालचाली सुरू केल्या जातात. पण सध्या काय सांगितले आहे यापेक्षा ते कोणी सांगितले, यालाच महत्त्व आलेय. हा बहुधा मानवी स्वभावच असावा, कारण 'फेक' की 'रिअल' याची खात्री करण्याची सुविधा फुकट देणारी अनेक ॲप हाताशी असतानाही आपण तसे न करता घातक आणि चुकीचे कृत्य करून मोकळे होतो. वर्णनावरून चित्र काढण्याचे जे कौशल्य आपल्यातील काहींमध्ये असते; त्याचाच हा अधिक उच्च पातळीवरचा तांत्रिक आविष्कार आहे.

आजकाल सोशियल मिडियावर दाखवली जाणारी दृश्ये किंवा प्रसंग त्यांच्या मूळ रूपात असतीलच याची कोणतीही खात्री प्रेक्षकांना मिळू शकणार नाही आणि हे घडायला पुढची पाच ते दहा वर्षे पुरेशी आहेत. पण येत्या काही दशकांमध्ये हा प्रकार वाढत जाण्याचीच शक्यता आहे, कारण असे व्हीडिओ बनवण्यातला आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सहभाग वेगाने वाढत असल्याने दाखवली जाणारी बाब खरी की खोटी हे ओळखणे जवळजवळ अशक्य बनणार आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प यांना अटक होताना, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ अश्रुधुरातून मार्ग काढताना दिसणारे प्रसंग पाहिल्याचे किंवा याबाबत वाचल्याचे आठवत नाही ना? नाहीच आठवणार, कारण असे काही घडलेलेच नाही. हे प्रसंग संगणकावर बनवलेले आहेत. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित 'मिडजर्नी' नावाच्या सॉफ्टवेअरने. पुरवलेल्या मजकुरावरून हे सॉफ्टवेअर प्रतिमा तयार करू शकते आणि त्या प्रतिमा किती हुबेहूब आहेत असेच वाटत राहते. वैद्यकीय, शिक्षण, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला आहे. फेक व्हिडीओ किंवा डीपफेक व्हिडीओ हे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले व्हिडीओ असतात, ज्यात व्यक्तींचे चेहरे, आवाज किंवा हालचाली खोटेपणाने बदलल्या जातात. मनोरंजन, जाहिरात, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे, परंतु त्याचा गैरवापरदेखील होऊ शकतो. जनरेटिव्ह एआय टूल्स वापरकर्त्यांच्या प्रॉम्प्ट (यूजर इनपुट) नुसार माहितीचे पृथःकरण करून नवनिर्मिती करतात. त्यातून निर्माण होणारी बाब मानवनिर्मित नाही हे स्पष्ट करण्याचे बंधन नसल्याने त्याच्या सत्यतेवर सर्वांचा विश्वास बसू शकतो.

एआय बनावट परंतु वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा आणि व्हिडिओंची निर्मिती करून चुकीची माहिती सर्वत्र प्रसारीत करू शकतात. यामागे प्रतिगामी, गुन्हेगारी, दहशतवादी अथवा व्यावसायिक स्पर्धक असू शकतात पण, ते पाठीमागे राहून अदृश्य राहू शकतात. त्यामुळे जनमताचा प्रभाव सहज शक्य आहे. डीपफेक व्हिडीओ तयार करण्यासाठी वापरली जाणारी प्रमुख एआय टूल्स अलिकडे चर्चेत आहेत. ही ॲप्स वापरताना सुरक्षित आणि नैतिक वापरासाठी सूचना घेणे आवश्यक आहे. एखाद्याच्या चेहऱ्याचा किंवा आवाजाचा वापर करण्यापूर्वी त्यांची स्पष्ट परवानगी घेणे अपेक्षित असते. व्हिडीओंमध्ये वॉटरमार्क्स वापरून ते एआयनिर्मित असल्याचे स्पष्ट करणे अपेक्षित होते. केवळ मनोरंजन, शिक्षण किंवा संशोधनासाठीच या तंत्रज्ञानाचा वापर करावा. राजकीय, सामाजिक किंवा वैयक्तिक हानीसाठी या तंत्रज्ञानाचा वापर टाळावा. माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विद्ध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमता प्राप्त झाली. या प्रकाराला, खरे तर गैरप्रकाराला वेळीच आळा न घातल्यास अराजक घडू शकते. परिणामी, सत्य लपवणे, ते वेगळ्या रूपात दाखवणे किंवा स्वतःला सोयीचा असेल तेवढाच भाग सांगणेही अगदी सहजशक्य होईल. यामध्ये प्रगत राष्ट्रांमध्ये उहापोह होऊन जागृती झाली आह

१ ऑगस्ट २०२४ रोजी, युरोपियन कृत्रिम बुद्धिमत्ता कायदा अंमलात आला. नवीन नियमांचा एक भाग म्हणून कायदा प्रतिबंधित अस्वीकार्य पद्धतींची यादी तयार करतो, ज्यामुळे धोका वाढतो. या प्रतिबंधाचा उद्देश लोकांच्या सुरक्षेसाठी अस्वीकार्ह्य पातळीचा धोका असलेल्या क्षेत्रावर किंवा अनाहूत भेदभाव करणाऱ्या प्रणालींवर आहे. आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरु आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकास आणि वापरासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे काय याची कायदेशीर व्याख्या करण्याची वेळ आली आहे. यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी खरेपणा तपासण्यासाठी काही वेबसाईट्स तयार करणे जरुरीचे आहे. तसेच सायबर कायदे बदलून त्यात फेक न्यूज, व्हिडिओचा प्रसार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना जबर शिक्षा व्हायला हवी. हे सर्व प्रकार फक्त राजकीय अथवा देशांमधील स्पर्धेपुरतेच नाहीत. उद्योग विश्व यापासून अलिप्त राहू शकत नाही. उद्योग आपले उत्पादन लोकप्रिय आणि अधिक लाभदायी करण्यासाठी स्पर्धक उद्योगांबद्दल गैरसमज, फेक माहिती सोशल मीडियावर पसरवू शकतो. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत, व्यवस्थापन उच्च शिक्षणात अंतर्भूत केलेच पाहिजे. नीतिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान ही बाब शालेय, महाविद्यालयीन शिक्षणात अंतर्भूत करायची हीच वेळ आहे. तसे झाले आणि एकूणच जागरुकता निर्माण झाली तर अशा गुन्हेगारी स्वरुपाच्या कृत्यांना आळा घालता येईल.

# पडसाद आणि दिलासा

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**

इराण-इस्त्रायल युध्दाचा एकूणच जागतिक अर्थव्यवस्थेवर ताण येत आहे. त्याचे पडसाद समजून घेण्याची गरज आहे. दरम्यान, खासगी क्षेत्रातील कंपन्यांची कामगिरी सरस झाली असल्याचे निरिक्षण तज्ज्ञमंडळी नोंदवत आहेत. याच सुमारास पॉलिसी सरेंडर केली, तरी आता जादा पैसे मिळू शकतात, असे स्पष्टीकरण एलआयसीतर्फे करण्यात आले आहे. अर्थनगरीत चर्चेत असलेल्या या बातम्यांचा वेध घेण्याची गरज आहे.

संपण्याच्या वाटेवर असलेल्या पण खऱ्या अर्थाने न संपणाऱ्या इराण आणि इस्त्रायलच्या युध्दाचा या दोन देशांवरच नाही, तर एकूणच अर्थव्यवस्थेवर ताण येत आहे. त्याचे उमटणारे पडसाद समजून घेण्याची गरज आहे. दरम्यान, खासगी क्षेत्रातील कंपन्यांची कामगिरी सरस झाली असल्याचे निरिक्षण तज्ज्ञमंडळी नोंदवत आहेत. याच सुमारास पॉलिसी सरेंडर केली, तरी आता जादा पैसे मिळू शकतात, असे स्पष्टीकरण एलआयसीतर्फे करण्यात आले आहे. अर्थनगरीत चर्चेत असलेल्या या बातम्यांचा वेध घेण्याची गरज आहे.

कमी-जास्त होत राहणारा इस्रायल आणि इराणमधील युध्दसंघर्ष लष्करी आघाडीपुरता मर्यादित नाही. या युद्धाचा आता दोन्ही देशांच्या आर्थिक कण्यावर मोठा परिणाम होत आहे. इस्रायलला दररोज अब्जावधी डॉलर्सचे थेट नुकसान होत आहे, तर इराणची आधीच तणावाखाली असलेली अर्थव्यवस्था अधिक तणावात आली आहे. इस्रायलची अर्थव्यवस्था प्रामुख्याने उच्च तंत्रज्ञान उद्योगावर आधारित आहे. गुगल, इंटेल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या जगभरातील ४०० हून अधिक बहुराष्ट्रीय कंपन्यांची संशोधन केंद्रे इस्रायलमध्ये आहेत. याशिवाय, हिरे कापणे आणि पॉलिशिंग उद्योग इस्रायलच्या निर्यातीत महत्त्वपूर्ण योगदान देतो. ग्रीनहाऊस तंत्रज्ञानाच्या मदतीने येथून शेती आणि फुलांची मोठी निर्यातदेखील होते. दुसरीकडे, इराणच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग तेल आणि नैसर्गिक वायूच्या निर्यातीवर अवलंबून आहे. 'इराण फ्रंट पेज'च्या अहवालानुसार २०२५ च्या अखेरीस इराण दररोज सुमारे ३.१ दशलक्ष पिंप तेलाचे उत्पादन करेल, त्यापैकी १.६ दशलक्ष बॅरल निर्यात केले जाईल, असा अंदाज आहे. याशिवाय, इराणचे कृषी आणि उत्पादन क्षेत्रदेखील महसुलात महत्त्वाची भूमिका बजावतात.

अमेरिका आणि युरोपने इराणवर लादलेल्या अनेक निर्बंधांमुळे, तो त्याचे बहुतेक तेल आणि वायू फक्त चीनला निर्यात करतो. २०२३ मध्ये इराणने दररोज सरासरी १.१ दशलक्ष पिंप तेल चीनला पाठवले. जीडीपीच्या आधारावर इस्रायलची अर्थव्यवस्था ५८३ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली आहे तर जागतिक नाणेनिधीच्या अहवालानुसार २०२५ मध्ये इराणचा जीडीपी सुमारे ४६३ अब्ज डॉलर आहे. तथापि, हा अंदाज इस्रायलशी युद्ध सुरू होण्यापूर्वीचा आहे. इस्रायलचा महागाई दर तीन टक्क्यांच्या जवळपास आहे तर इराणमध्ये तो २९.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. इस्रायलवर परकीय कर्ज जीडीपीच्या सुमारे १०५ टक्के आहे तर इराणचे परकीय कर्ज जीडीपीच्या फक्त १.८ टक्के आहे. 'कॅल्कॅलिस्ट' या इस्रायली वृत्तपत्राच्या अहवालानुसार युद्धाचा थेट आर्थिक खर्च इस्रायलसाठी खूप मोठा आहे. हा देश लष्करी खर्चावर अब्जावधी डॉलर्स खर्च करत आहे. त्यात क्षेपणास्त्र इंटरसेप्टर, एफ-३५ विमाने उडवणे आणि दारूगोळा यांचा समावेश आहे. केवळ इराणवर झालेल्या पहिल्या क्षेपणास्त्र हल्ल्याचा खर्च ५९३ दशलक्ष डॉलर्स होता. याशिवाय, हजारो राखीव सैनिकांच्या तैनातीचा कामगार बाजारावर परिणाम झाला असून औद्योगिक उत्पादनात मोठी घसरण झाली आहे. ताज्या परिस्थितीमुळे येथिल पर्यटन आणि निर्यातीलाही फटका बसला आहे. त्याच वेळी इराणमधील परिस्थितीही कमी गंभीर नाही. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे त्याची अर्थव्यवस्था आधीच दबावाखाली होती; आता युद्धामुळे त्याची तेल निर्यातदेखील धोक्यात आली आहे.

युद्धामुळे तेल पाइपलाइन किंवा रिफायनरीजचे नुकसान झाले, तर हा महसूल स्रोतदेखील थांबू शकतो. तसेच रियाल हे इराणी चलन वेगाने अवमूल्यन करत आहे. २०२४ मध्ये त्याचे मूल्य ५० टक्क्यांनी घसरल्याचे नोंदवले गेले होते. ते आता आणखी घटू शकते. कॅल्क्युलिस्ट्सच्या अहवालानुसार युद्ध दीर्घकाळ चालू राहिल्यास इस्रायलच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. २०२५ चे संरक्षण बजेट आधीच ३८.६ अब्ज डॉलर्सवर पोहोचले असून एकूण बजेट २१५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत युद्ध एका महिन्यापेक्षा जास्त काळ चालले तर फक्त लष्करी खर्च १२ अब्ज डॉलर्सच्या पुढे जाऊ शकतो. यामुळे इस्रायलची बजेट तूट जीडीपीच्या पाच टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. तसेच परकीय गुंतवणूक आणि नवोन्मेषावर आधारित उच्च तंत्रज्ञान क्षेत्रावरही या अस्थिरतेचा वाईट परिणाम होऊ शकतो. इराणची परिस्थिती थोडी वेगळी आहे. जागतिक नाणेनिधीने २०२५ मध्ये इराणचा आर्थिक विकास दर ३.१ टक्के असण्याचा अंदाज वर्तवला आहे. निर्बंध असूनही या देशाने स्वतःला काही प्रमाणात स्थिर ठेवले आहे. इराणचा चालू खात्यातील अधिशेष १३.९ अब्ज डॉलर्सपर्यंत असण्याची अपेक्षा आहे; परंतु युद्धात रिफायनरीज किंवा गॅस क्षेत्रांवर हल्ला झाल्यास महसूल ४० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो.

अल्पकालीन नुकसानाच्या बाबतीत इस्रायल अधिक असुरक्षित स्थितीत आहे. मोठ्या प्रमाणात लष्करी खर्च, जागतिक पुरवठा साखळींवरील अवलंबित्व आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील घसरणीमुळे त्याची अर्थव्यवस्था थेट प्रभावित होत आहे. हा संघर्ष पुढे गेल्यास जीडीपी २० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. इराणची अर्थव्यवस्था आधीच दबावाखाली आहे; परंतु ती बऱ्याच काळापासून निर्बंधांशी जुळवून घेत आहे. त्यामुळे त्याचा तात्काळ धक्का थोडा कमी जाणवू शकतो. तथापि, युद्धाने तेल उत्पादन पायाभूत सुविधा नष्ट केल्यास त्याला पुनर्बांधणीवर अब्जावधी डॉलर्स खर्च करावे लागू शकतात आणि जीडीपी सात टक्क्यांपर्यंत घसरू शकतो. इस्रायलला युद्धाचा फटका सहन करावा लागत आहे. अमेरिकेला अल्पावधीत अधिक आर्थिक दबावाचा सामना करावा लागत आहे, तर इराणला दीर्घकालीन संसाधनांचे नुकसान आणि महागाईसारख्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. युद्ध एक महिन्यापेक्षा जास्त काळ चालल्यास केवळ या दोन देशांची आर्थिक स्थिरता धोक्यात येईल, असे नाही तर पश्चिम आशियातील संपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्था संकटात येऊ शकते.

दरम्यान, गेल्या चौदा महिन्यांमध्ये जून महिन्यात खासगी क्षेत्रात प्रचंड वाढ झाली असल्याची बातमी आहे. 'एचएसबीसी' आणि 'एस अँड पी ग्लोबल'ने केलेल्या सर्वेक्षणात हे समोर आले आहे. याचे कारण आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत ऑर्डरमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. मे महिन्यात 'इंडिया कंपोझिट पीएमआय' ५९.३ होता. तो जूनमध्ये ६१ वर पोहोचला. हा सलग सत्तेचाळीसवा महिना आहे, जेव्हा 'पीएमआय' निर्देशांक ५० च्या वर आहे. हा आकडा ५० च्या वर असल्यास व्यवसायात वाढ झाली आहे असे मानले जाते. तो यापेक्षा कमी असल्यास घट मानली जाते. मॅन्युफॅक्चरिंग 'पीएमआय' मे महिन्यात ५७.६ होता. तो एका महिन्यानंतर म्हणजेच जूनमध्ये ५८.४ वर पोहोचला. एप्रिल २०२४ च्या तुलनेत ही एक उत्तम कामगिरी आहे. या सुधारणेला इन्व्हेंटरी, रोजगार, उत्पादन आणि नवीन ऑर्डर कारणीभूत आहेत. 'एचएसबीसी'चे मुख्य भारतीय अर्थतज्ज्ञ प्रांजुल भंडारी यांच्या मते जून महिन्यात भारतातील खासगी क्षेत्राची वाढ झपाट्याने झाली आहे. सर्वेक्षणात म्हटले आहे की वाढत्या मागणी आणि अनुशेषामुळे कंपन्यांनी जून महिन्यात भरती केली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय मागणी आणि ऑर्डरमध्ये वाढ हेदेखील याचे एक कारण आहे. एकीकडे, उत्पादन क्षेत्रात अर्धवेळ आणि पूर्णवेळ नोकऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. दुसरीकडे, सेवाक्षेत्रात भरतीचा कल सकारात्मक परंतु थोडा कमकुवत आहे. आठशे कंपन्यांकडून अभिप्राय घेऊन 'फ्लॅश पीएमआय' अहवाल तयार करण्यात आला आहे. तथापि, उत्पादन 'पीएमआय'चा अंतिम अहवाल १ जुलै रोजी प्रसिद्ध केला जाईल तर संमिश्र आणि सेवा अहवाल ३ जुलै रोजी प्रसिद्ध केला जाईल. कार्यक्षमता, मागणी आणि तंत्रज्ञानातील गुंतवणुकीमुळे उत्पादनात मोठी तेजी दिसून येत आहे, असे मानले जाते.

आता एक लक्षवेधी बातमी. भारतीय जीवन विमा (एलआयसी) आणि इतर कंपन्यांकडून अनेकजण विमा काढून घेत असतात; परंतु अनेक वेळा विम्याचे हप्ते वेळेवर भरले जात नाहीत. त्यामुळे त्यांची पॉलिसी बंद पडते. अनेकजण पूर्ण काळ होण्यापूर्वीच पॉलिसी सरेंडर करतात; परंतु सरेंडरनंतर खूप कमी पैसे मिळतात. आता आयआरडीएआय (भारतीय विमा नियामक प्राधिकरण) ने सरेंडर व्हॅल्यूच्या नियमांमध्ये चांगला बदल केला आहे. त्यानुसार पॉलिसीधारकांना आधीच्या तुलनेत २०-३० टक्के जास्त रक्कम मिळणार आहे. एखादी व्यक्ती आपली जीवन विमा पॉलिसी मुदत पूर्ण होण्यापूर्वी बंद करतो, तेव्हा विमा कंपनी त्याला परत करत असलेल्या रकमेला 'सरेंडर व्हॅल्यू' म्हणतात. तुम्ही किती वर्षे प्रीमियम भरला आहे आणि कोणत्या प्रकारची पॉलिसी घेतली आहे, यावर हे मूल्य अवलंबून असते. 'आयआरडीएआय'कडून 'सरेंडर व्हॅल्यू'च्या नियमात बदल केला आहे. आता सर्व एंडोमेंट पॉलिसींवर 'स्पेशल सरेंडर व्हॅल्यू' लागू होणार आहे. म्हणजेच ग्राहकांना पॉलिसी सरेंडरसाठी पूर्वीपेक्षा जास्त रक्कम मिळणार आहे. पूर्वी दोन वर्षांचे प्रीमियम भरल्यानंतर 'सरेंडर व्हॅल्यू' मिळत होती; परंतु आता एका वर्षाच्या प्रिमियमनंतरही सरेंडर व्हॅल्यू मिळणार आहे. आता नवीन नियमानुसार 'सरेंडर व्हॅल्यू'ची मोजणी होणार आहे. तुम्ही चार वर्ष प्रीमियम भरल्यानंतर पॉलिसी सरेंडर करणार असाल, तर पूर्वी मिळणारी चार लाखाला २.४ लाख रुपये इतकी रक्कम आता ३.१ लाख रुपये इतकी असू शकते. तसेच पूर्ण वर्षभर प्रीमियम भरल्यानंतर काहीच मिळत नव्हते. आता एका लाखाला ६२ हजार रुपये परत मिळणार आहेत. 'आयआरडीएआय'ने 'सरेंडर व्हॅल्यू' मोजण्यासाठी एक नवीन फॉर्म्युला ठरवला आहे. आता दहा वर्षांच्या सरकारी बॉंडचा व्याजदर आधार म्हणून धरला जाईल. विमा कंपन्या त्यात जास्तीत जास्त ०.५० टक्के भर घालू शकतात. ही नवी पद्धत सिंगल प्रीमियम आणिपाच वर्षांपेक्षा कमी कालावधीच्या पॉलिसींनादेखील लागू असेल.

# नितीन दिनकरांच्या बदनामीविरोधात समाज एकवटला

## मातंग समाजाची अस्मिता डावलण्याचा प्रयत्न; दोषींवर तात्काळ कारवाईची मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर उत्तरचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांची तृप्ती देसाई नामक महिलेने सोशल मीडियावर व विविध प्रसारमाध्यमांतून आक्षेपार्ह व्हिडीओ व बातम्या पसरवून बदनामी केली आहे.

श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मातंग समाज दलित म्हणूनच वारंवार अन्यायाचा सामना करत आला आहे. ही बदनामी केवळ नितीन दिनकर यांची नाही, तर संपूर्ण मातंग समाजाच्या प्रतिष्ठेवर डाग आणणारी आहे. यापुढे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. दोषींवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा संपूर्ण मातंग समाज आणि दलित बांधवांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**सर्व मातंग समाज एकजुटीने पाठीशी**

हा प्रकार केवळ नितीन दिनकर नव्हे, तर संपूर्ण मातंग समाजाच्या अस्मितेवर थेट आघात करणारा असल्याची तीव्र भावना समाजात व्यक्त होत आहे.

यावेळी विजय शेलार, भागचंद नवगिरे, बंडूकुमार शिंदे, मोहन आव्हाड, लहूभाऊ खंडागळे, सतिश सौदागर, विठ्ठल गालफाडे, मोहन आडागळे, विलास जाधव, विजय पवार, विशाल लाहुंडे आदी समाज बांधव व कार्यकर्ते उपस्थित होते.

या घटनेच्या निषेधार्थ मातंग अस्मिता संघर्ष सेना लहुजी शक्ती सेना, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे समिती, आरपीआय मातंग आघाडी व सर्व मातंग समाज बांधव एकजुटीने उभे राहिले आहेत.

# मालवाहतूकदारांच्या संपावर तोडगा काढा

## आ. काशिनाथ दाते यांची पावसाळी अधिवेशनात मागणी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** राज्यातील मालवाहतूक संघटनांनी आपल्या विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या संपामुळे संपूर्ण राज्यातील पुरवठा साखळी धोक्यात आली आहे. या गंभीर पार्श्वभूमीवर आ. काशिनाथ दाते यांनी पावसाळी अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करत सरकारने तातडीने हस्तक्षेप करून संघटनांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्यात, अशी ठाम मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली असल्याचे आ. दाते यांनी सांगितले.

आ. दाते म्हणाले की, वाहतूक पोलिसांकडून होणारी अकारण कारवाई, ई-चलनाच्या माध्यमातून होणारी अन्यायकारक दंडवसुली, जीपीएस, वेब रीडर आणि सीसीटिव्ही यांचा गैरवापर, वाहकाला सहाय्यकाची सक्ती असूनही सहाय्यक उपलब्ध नसल्यामुळे होणारे दंड यामुळे मालवाहतूक क्षेत्र त्रस्त झाले आहे. याविरोधात संघटनांनी संपाचे हत्यार उपसले असून, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. संपामुळे अत्यावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असून, काही दिवस हा संप सुरू राहिला, तर संपूर्ण अर्थचक्र ठप्प होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला. जवाहर नेहरू बंदर क्षेत्र परिसरात मालवाहतूक गाड्यांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे चालकांना रस्त्याच्या कडेला गाड्या लावाव्या लागतात आणि अशावेळी पोलिसांकडून होणारी कारवाई अन्यायकारक असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पत्र दिले आहे. शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. तात्काळ बैठक बोलवावी आणि संघटनांशी संवाद साधून योग्य तो निर्णय घ्यावा. संपामुळे सामान्य जनतेचे आणि उद्योगविश्वाचे नुकसान होण्यापूर्वी सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजे.
**– काशिनाथ दाते, आमदार**

# फळपीक विमा योजनेसाठी मुदतवाढ

## ६ जुलैपर्यंत शेतकऱ्यांना विमा भरण्याची शेवटची संधी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत मृग बहार २०२५ मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू, संत्रा, चिकू व मोसंबी या पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत ३० जून २०२५ होती. मात्र दिनांक २७ जूनपासून आधार संलग्न संकेतस्थळात (www.pmfby.gov.in) तांत्रिक अडचणी आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना विमा भरता आलेला नाही.

ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने शेतकऱ्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करत दि. ३ ते ६ जुलै २०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे विमा भरण्याची ही शेवटची संधी शेतकऱ्यांना मिळाली आहे.

तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, ज्यांनी अद्याप फळपिक विमा भरलेला नाही, त्यांनी ही संधी दवडू नये व आजच विमा भरून आपले पीक संरक्षणाखाली आणावे. विमा भरण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ (www.pmfby.gov.in) उपलब्ध आहे.

फळपीक विमा योजना हवामानावर आधारित असून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून पिकांचे आर्थिक संरक्षण करते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी करून शासनाच्या या लाभदायक योजनेचा अवश्य फायदा घ्यावा.
**– महादेव लोंढे, तालुका कृषी अधिकारी**

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## शिवरायांच्या विचारांवर चालणारे महायुती सरकार

आरोग्य विभाग यांच्या माध्यमातून सुमारे ५१५ लाभार्थ्यांना दाखले व थेट योजनांचा लाभ देण्यात आला असून शासन आपल्या दारी अभियानाच्या माध्यमातूनच हा उपक्रम हाती घेण्यात आला असून यातून निश्चित सर्वसामान्य नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

यावेळी गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, नायब तहसीलदार आप्पासाहेब शिंदे, चेअरमन पुरुषोत्तम आठरे, एकनाथ आटकर, वैभव खलाटे, जिजाबापू लोंढे, संतोष शिंदे, प्रीती शिंदे, संकेत कराळे, अनिल शेलार, डॉ. नंदकिशोर नरसाळे, कारभारी गवळी, राजेंद्र तागड, राजु गवळी, अण्णासाहेब शिंदे, शुभम मोटे, अण्णासाहेब होंडे, गौतम कराळे, अशोक दहातोंडे, गहिनीनाथ खाडे, देवेंद्र गीते, रामेश्वर फसले, डॉ. संजय कराळे, बापूसाहेब घोरपडे, नवनाथ निंबाळकर, प्रमोद गाडेकर, विजया सोलाट यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी भरलेल्या बसचा अपघात

अपघाताची माहिती मिळताच पालकांनीही रुग्णालयात धाव घेऊन आपल्या पाल्यांना आधार दिला.

या घटनेमुळे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेसच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागातून विद्यार्थ्यांना शहरांमधील शाळांमध्ये आणण्यासाठी अनेक शाळा प्रयत्नशील असतात, मात्र या स्कूल बसेस शासनाने घालून दिलेल्या नियमांचे आणि अटींचे पालन करतात का, याबाबत अनेकदा शंका उपस्थित होते.

## अहिल्यानगरचे पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर

व दोन मोटार सायकलचा समावेश आहे. पथकाने ताब्यातील आरोपीस मुद्देमालासह श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन येथे हजर केले. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ चे कलम ३०३ (२), ३ (५) वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करत आहेत.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या तपास पथकातील पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, संदीप दरंदले, रणजीत जाधव, आकाश काळे व रमीजराजा आत्तार आदींनी पार पाडली.

# भंडारदरा धरण पाणलोट क्षेत्रात पावसाची बॅटिंग

## धरणातून पाणी सोडल्याने रंधा फॉल सुरु, पर्यटकांना पर्वणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : भंडारदरा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढला असून आज रोजी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ७४४१ दलघफू (६७.४१ टक्के) झाल्याने रंधा फॉल सुरु झाला असुन पर्यटकांना पर्वणी सुरु झाली आहे.

भंडारदरा व निळवंडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पर्जन्यमान चांगल्या प्रकारे होत आहे. जलाशय परिचलन सूची नुसार पाणीपातळी नियंत्रित ठेवणेकरीता भंडारदरा धरणातुन विद्युतगृह मधून ८४५ क्युसेक्स तर स्पील- वे गेट मधून १०५८ क्युसेसने पाणी सोडण्यात आले असून एकूण १९०३ क्युसेस पाणी धरणातून विसर्ग सुरू आहे. पाण्याची आवक वाढल्यास अथवा कमी झाल्यास विसर्ग कमी जास्त होऊ शकतो. १५ जुलैपर्यंत ६५ टक्के लेव्हल कायम ठेवण्यात येणार आहे. असे शाखा अभियंता प्रवीण भांगरे यांनी सांगितले.



### भात खाचरे भरल्याने आनंद

मुळा परिसरात पावसाची तांडव वाढल्याने मुळा नदी दुथडी भरून वाहत आहे. मुळा धरणात चांगला पाणी साठा होत आहे. मात्र आदिवासी भागात भात खाचरे भरले असलेने रोपे पाणी खाली गेल्याने अवनीस उशिर होत आहे तर काही ठिकाणी शेतकऱ्यांचे बांध फुटले आहे. शेतकरी अडचणीत आला आहे. रोपे जर गेली तर भात लागवड होणार कसा प्रश्न निर्माण झाला आहे.

मागील दोन दिवस या दोन्ही पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण जास्त झाले होते. पंधरा दिवसांपासून पडत असलेला पाऊस आता काहीशी उघडीप देणार, असे वाटत आहे असतानाच सकाळपासून पुन्हा एकदा पावसाने जोर कमी जास्त होत असून गत २४ तासात भंडारदरा ३० येथे मिमी, घाटघर ७४ मिमी, तर रतनवाडी येथे ६६ मिमी, पांजरे येथे ५८ मिमी पाऊसाची नोंद झाली आहे. तर सतत कोसळत असलेल्या पावसामुळे भंडारदरा धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे.

धरणातून पाणी सोडल्याने रंधा धबधबा प्रथमच वाहता झाला असल्यामुळे पर्यटकांना आनंद होत आहे. तसेच भंडारदरा धरणातून सोडलेले पाणी निळवंडे धरणात जमा होत असून सध्या निळवंडे धरणातून शेती आवर्तनासाठी ९०० क्युसेस ने विसर्ग चालू आहे. त्यामुळे प्रवरा नदी पात्रात पाण्याची पातळी वाढते आहे. आढळा नदीवरील देवठाण धरण भरले असून आढळा नदी पात्रात पण पाण्याची पातळी वाढली असून हे पाणी प्रवरा नदीला मिळणार आहे.

## वारी पंढरीची उपक्रमात सिन्नरचे विद्यार्थी सहभाग घेणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : वारी पंढरीची... ज्ञानगंगा प्रवरेची उपक्रमामध्ये सिन्नर येथील सिंधु छाया कॅम्पचे वारकरी होणार सहभागी होणार आहेत.पंढरीची वारी ही महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा जपण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांच्या सहभाग असलेली वारी पंढरीची ज्ञानगंगा प्रवरेची या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, वारकरी वेषभूशेतील विद्यार्थी वारीतील भव्य रिंगण सोहळ्याच्या माध्यमातून प्रति पंढरपूर निर्माण करणार आहेत.या विशेष उपक्रमाचे आयोजन शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता लोणी येथील विखे पाटील सैनिकी स्कूल समोरील भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला असून तत्पुर्वी सर्वगावांमधून विद्यार्थी शिक्षक आणि पालकांचा सहगाग असलेल्या दिंड्या टाळ मृदूगांचा गजर आणि विठु नामाचा जयघोष करीत सहकारच्या भूमीत दाखल होणार असून यासर्व दिंड्याचे भव्य स्वागत करण्यासाठी सहकार नगरी सज्ज झाली आहे. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून या आषाढी वारीच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## व्यापारी संकुलाच्या कामास होणार प्रारंभ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदार संघासह कोपरगाव शहराला विकासाच्या वाटेवर घेवून येणाऱ्या आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून सोमवार रोजी कोपरगाव शहरात कोपरगाव नगरपरिषद इमारती समोर आणखी एक व्यापारी संकुल उभारले जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सुनील गंगुले यांनी दिली आहे.कोपरगाव शहराची बाजारपेठ फुलविण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेच्या मालकीच्या मोकळ्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नातून कोपरगाव बस स्थानकाच्या लगत असलेल्या परिसरात १४ कोटीच्या व्यापारी संकुलाचे काम प्रगतीपथावर असतांना कोपरगाव शहरात आणखी एक व्यापारी संकुल उभारले जाणार आहे. सोमवार (दि.०७) रोजी कोपरगाव नगरपरिषद इमारती समोर या व्यापारी संकुलाची पायाभरणी होणार असून या कामाचे भूमिपूजन आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी कोपरगाव शहरातील सर्व व्यापारी बांधवांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सुनील गंगुले यांनी दिली आहे.

## बोरुडेंची राजपत्रित अधिकारीपदी निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगा तर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा या परीक्षेत राहुरी तालुक्यातील गुहा येथील रुपाली अजिंक्य बोरुडे यांना यश मिळाले आहे. त्यांची सहाय्यक अभियंता पीडब्ल्यूडी (वर्ग २ राजपात्रित अधिकारी) या पदावर निवड झाली आहे. त्यांची जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद, स्टाफ सिलेकशन कमिशन या सर्व विभागांमध्ये स्पर्धा परीक्षा लद्वारे कनिष्ठ अभियंता या पदावर निवड झाली होती. गेल्या वर्षभरात स्पर्धा परीक्षेत हे त्यांचे चौथे यश आहे. रुपाली बोरुडे या बी. ई. सिविल, एम. ई. स्ट्रकचर असून सध्या त्या जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहे. वयाच्या चौथ्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले असतानाही आई सासू-सासऱ्यांच्या, मामा-मामींच्या पाठबळामुळे यशाला गवसणी घातली आहे. राहुरी पंचायत समितीचे माजी सदस्य कै. गुलाबराव बोरुडे व श्रीराम दूध संघांचे संचालक दिलीपराव बोरुडे यांचा त्या सुनबाई तर इंजिनिअर अजिंक्य बोरुडे यांच्या पत्नी आहे.

## महानगरपालिका असून अडचण नसून खोळंबा

### कर्मचाऱ्यांची वाणवा; नागरिकांसमोर अनेक समस्या




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महानगरपालिका नगरवासियांसाठी असुन अडचण नसुन खोळंबा अशी परिस्थिती आहे. अहिल्यानगर महानगरपालिका नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कर्मचारी संख्या अपुरी असल्या कारणाने शहर वासियांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या १२८३ पदे रिक्त आहेत.

नागरिकांच्या दृष्टीने आरोग्याचा प्रश्न आहे. कर वसुली अगदी नगण्य होते, पाणी पुरवठा सुरळीत नाही, अश्या वेगवेगळ्या समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागते. परिणामी नागरिक मोर्चा, आंदोलन काढतात. या सगळ्या गोष्टीत कारणीभूत आहे. महापालिकेची अपुरी कर्मचारी संख्या जे कर्मचारी कामावर असतात त्यांना बऱ्याच वेळा दोन प्रभागात ड्युटी करावी लागते.कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याकारणाने शहरातील थकबाकी वसूल करण्याचे प्रमाण कमी आहे. पालिकेने थकबाकी वसूल केली असली तरी त्या तुलनेत ती अगदी कमी स्वरूपात आहे. शास्तीमाफी देऊनही नागरिक थकबाकी भरत नाही. याला जबाबदार हि पालिकाच आहे. पालिका कर्मचारीकडे विभाग नुसार आकडेवारी मागितली असता विभागवार कर्मचाऱ्यांची माहिती आमच्याकडे उपलब्ध नाही. आमच्याकडे एकगठ्ठा माहिती आहे. महापालिका हद्दीतील शहराची लोकसंख्या हि अंदाजित २०२४ मध्ये ४.२० लाखाच्या घरात आहे. एवढ्या लोकसंख्येसाठी मनपाकडे पुरेशे कर्मचारी देखील उपलब्ध नाहीत.सध्या मनपात प्रशासकीय २८ विभाग आहेत. त्यासाठी १५८८ एवढी कर्मचारी आहेत. अनुकंपावर दरवर्षी २० टक्के कर्मचारी भरती केली जाते.कर्मचारी संख्या अपुरी असल्या कारणाने मानधनावर काम करणाऱ्या लोकांना मनपा पोसत आहे. नागरिकांचे कामे वेळेवर होत नाही.

## महिन्याच्या ५ तारखेपूर्वीच पेन्शन होणार जमा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : जिल्हा परिषदेत अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या माध्यमातून अदालत पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत सर्व पेन्शनधारकांची पेन्शन जमा होणार असल्याचे संघटनेला अनुदानपत्र प्राप्त झाले असून, या निर्णयाचे संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले .

या अदालतीत मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी पेन्शन संदर्भातील धोरण स्पष्ट केले. तसेच अंश राशीकरण, उपदान रक्कम, निवड श्रेणी व प्रलंबित मुद्यांवर तातडीने निर्णय घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून रखडलेले प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संगणक वसुलीबाबत देखील लवकरच रक्कम मिळणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट




केल्याने, संबंधित लाभार्थीमध्ये समाधान व्यक्त होत आहे.पेन्शनर्सचे विविध प्रश्न सुटण्यासाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे दशरथ ठुबे, सरचिटणीस बन्सी उबाळे कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, उपाध्यक्ष विनायक कोल्हे, सुखदेव वांडेकर, ज्ञानदेव लंके, धोंडीबा गांगर्डे, सोमनाथ कळसकर, बापूसाहेब कर्पे, कारभारी शिकारे, भाऊसाहेब लावरे, ज्ञानदेव थोरात, रामचंद्र ठोंबरे, भाऊसाहेब गोरे, अविनाश गांगर्डे, प्रताप आंब्रे, बेबीताई तोडमल, शामला साठे, निनाबाई जोंधळे, गजानन ढवळे, मुरलीधर देशमुख आदी प्रयत्नशील आहेत.

## १५ दिवसात केडगाव उपनगराचा वीजपुरवठा सुरळीत करणार

### महावितरण अधिकाऱ्यांचे बैठकीत माजी सभापती कोतकर यांना आश्वासन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगाव उपनगराचा विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार प्रशासनाने आंदोलन न करण्यासाठी पत्र व्यवहार केला व बैठकीचे आयोजन करून केडगाव उपनगराचे विजेचे प्रश्न पुढील १५ दिवसात सोडविण्याचे आश्वासन अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस. आर. राहींज यांनी बैठकीत दिले असल्याची माहिती मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिली. यावेळी सहाय्यक अभियंता राहुल शिलावत व कर्मचारी उपस्थित होते

केडगाव उपनगराचा गेल्या एक महिन्यांपासून विजेचा लपंडाव चालू असल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहे. महावितरण कार्यालयाकडून कुठलीही पूर्वसूचना न देता रात्री- अपरात्री लाईट जात असल्यामुळे नागरिकांमध्ये महावितरण कंपनीविरोधात संतापची लाट आहे.

कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे नागरिकांचे प्रश्न मार्गी



लावण्यासाठी बरेच दिवस वाट पहावी लागते, त्यामुळे कर्मचारी संख्या वाढवावी, अशी मागणी मनोज कोतकर यांनी केल्यानंतर केडगाव उपनगराचे दोन भागात विभागणी केली जाणार असल्यामुळे कर्मचारी देखील वाढवून दिले जाणार असल्याचे महावितरण कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

दौंड रस्त्यावरील विद्यानगर, हनुमाननगर, इंदिरानगर, कायनेटिक चौक या परिसराचा विद्युत पुरवठा ग्रामीण भागाला जोडला असल्यामुळे लाईट वारंवार जात असून ओव्हरलोडचा प्रश्न निर्माण होत आहे, सातत्याने लाईट जात असल्यामुळे घरातील विजेवर असणारी उपकरणे जळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी हा विद्युत पुरवठा शहरी भागाला जोडला जावा, आणि या परिसराला पूर्ण दाबाने वीजपुरवठा करण्याची मागणी माजी सभापती मनोज कोतकर यांनी केली आहे.

## अस्थिव्यंगांना मिळणार मोफत कृत्रिम अवयव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व एस. आर. ट्रस्ट, मध्य प्रदेश, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, एडीप योजनांतर्गत जिल्ह्यातील तालुका निहाय अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम हात, पाय बसविणे, कॅलिपर्स यांचे मोजमाप व तात्काळ मोफत जागेवर साहित्य वाटप शिबिराचे आयोजन दि. ७ ते २१ जुलै या कालावधीपर्यत सकाळी १० ते ५ या वेळेत करण्यात आले आहे.

या शिबिरामुळे जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय, कॅलिपर्स तयार करून घेण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही. या शिबिरासाठी येतानी आधार कार्ड, वैश्विक कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला याची सत्यप्रत तसेच छायांकित प्रत घेऊन येणे गरजेचे आहे. शिबिरास येतांना मदतनीस किंवा नातेवाईक सोबत घेऊन यावे.ही शिबिरे खालील ठिकाणी सकाळी १० ते ५ या वेळात होणार आहेत. अहिल्यानगर शहर दि. ७ जुलै जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट अहिल्यानगर, दि. ८ जुलै उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी, दि. ९ जुलै जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय, टिळक रोड, अहिल्यानगर, दि. १० जुलै नुतन कन्या विद्यालय, राहुरी, दि. ११ जुलै मूकबधिर विद्यालय, गायत्री मंदिराजवळ, अशोक थिएटर समोर, बेलापूर रोड, श्रीरामपूर, दि. १२ जुलै आनंद लॉन्स मंगल कार्यालय, पारनेर बाजार समिती रोड, पारनेर, दि. १३ जुलै ग्रामीण आरोग्य केंद्र, घुलेवाडी, संगमेनर, दि. १४ जुलै महात्मा गांधी चॅरिटेबल ट्रस्ट साईबाबा तपोभूमी प्रदर्शन हॉल, कोपरगाव, दि. १५ जुलै साई विठ्ठला लॉन्स, चितळी रोड, राहता, दि. १६ जुलै ग्रामीण रुग्णालय, शेवगाव.जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व शिबिरे होणार आहे. जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजित दिवटे, प्रकल्प समन्वयक डॉ. दिपक अनाप व डॉ. अभिजित मेरेकर यांनी केले आहे.

## मुलांसाठी संस्कार शिबिरांची गरज

### खानविलकर; बेलापूर येथील शिबीरास प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर**: सध्याच्या मोबाईलच्या काळात मुलांवर संस्कार होत नाहीत. मोबाईलसारख्या प्रसारमाध्यमांच्या विळख्यात मुले अडकल्याने त्यांचे भवितव्य अंधःकारमय होत आहे. अशाकाळात संस्कार वर्गाचे आयोजन करुन मुलांकडून विविध उपक्रम राबवीणे स्तुत्य असल्याचे प्रतिपादन मोहनकाका खानविलकर यांनी केले.

बेलापूर येथील विठ्ठल मंदिरात मुलांसाठी विशेष उन्हाळी संस्कारवर्गाचे कल्याणी काळे, राहुल डावरे व सखाराम मुळे यांचे मार्गदर्शनाखालीआठ दिवसिय विशेष बालसंस्कार वर्गाचे आयोजन केले होते. या शिबिराच्या समारोपप्रसंगी खानविलकर बोलत



होते. यावेळी सतिष भगत, सोपानबुवा हिरवे, डॉ. संपदा काळे, डॉ. माधव पगारे, डॉ. राशिनकर, निलेश हरिदास उपस्थित होते. शिबिरासाठी सोपानबुवा हिरवे यांनी विठ्ठल मंदिर उपलब्ध केले. शरद नवले, अभिषेक खंडागळे, आजिंक्य साळुंके,प्रशांत खरोटे,सुमती चालक, वैदेही डावरे, कृष्णा भागवत, ओमकार कोळपकर, विजय नागले, मुकुंद चिंतामणी, संतोष मवाणी आदींचे सहकार्य लाभले.

# श्रीरामपूरच्या राजकारणात महिलांमध्ये वाढती असुरक्षितता?

## एका वर्षात तीन गंभीर घटना, महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा आला ऐरणीवर

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : शहरात गेल्या एक वर्षाच्या कालावधीत घडलेल्या तिन गंभीर घटनांमुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. तरुण, मध्यमवयीन आणि ज्येष्ठ अशा विविध वयोगटातील महिलांशी संबंधित या घटनांनी संपूर्ण परिसरात चिंता निर्माण केली आहे.

विशेषतः या घटनांमध्ये संबंधित आरोपींचा राजकीय पृष्ठभूमीशी कथित संबंध असल्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ‘श्रीरामपूरसारख्या राजकीयदृष्ट्या सक्रिय शहरात महिला खरंच सुरक्षित आहेत का?’ असा प्रश्न आता जनतेच्या मनात ठसठसून राहिला आहे. गेल्या काही महिन्यांपासून राजकीयदृष्ट्या प्रभावशाली पदांवरील काही व्यक्तींवर महिलांचे लैंगिक, मानसिक व सामाजिक शोषण केल्याचे आरोप झाले आहेत. या प्रकरणांमध्ये एकीकडे तक्रारदार महिलांना



न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, तर दुसरीकडे आरोपींना राजकीय वरदहस्त मिळाल्याचेही संकेत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिले आहेत.

या घटना केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित न राहता एक सामाजिक प्रश्न बनत चालल्या असून, महिलांमध्ये वाढत्या असुरक्षिततेची भावना, राजकारणात महिलांना मिळणाऱ्या संधींवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. महिलांच्या सहभागावर गर्व करणाऱ्या श्रीरामपूरच्या राजकारणाला हे काळं फासले गेल्यासारखं चित्र निर्माण झालं आहे. महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुण कार्यकर्त्यांकडून या घटनांचा तीव्र निषेध होत असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. महिलांना सुरक्षित आणि आत्मविश्वासाने कार्य करण्याचे वातावरण देणे ही केवळ पोलिसांचीच नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे, असे मत विविध ठिकाणी व्यक्त केले जात आहे.

*एकंदरीत, वर्षभरात घडलेल्या या तिन घटनांनी श्रीरामपूर शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. महिलांमध्ये वाढत चाललेली भीती आणि असुरक्षतेची भावना यावर उपाय योजना न केल्यास भविष्यात महिलांचा राजकारणातील सहभाग मंदावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या घटनांची गंभीर दखल घेऊन, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि महिलांना सुरक्षित राजकीय मंच उपलब्ध करून देणे, ही काळाची गरज बनली आहे.*

# अनु. जाती-जमातीसाठी स्वतंत्र आयोग आवश्यकच होता

## आ. सत्यजित तांबे; आदिवासींची परिस्थिती, आश्रमशाळा, वस्तीगृह यांच्यासह विविध प्रश्नांची मांडणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आदिवासी समाज हा जल जंगल आणि जमीन यांच्यावर खऱ्या अर्थाने अधिकार असलेला मूळनिवासी समाज आहे. अनुसूचित जाती जमाती,बारा बलुतेदार, १८ पगड समाज या सर्वांच्या विकासासाठी ठोस उपाययोजना गरजेचे असून आदिवासी विभागातील परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता स्थापन करण्यात आलेला स्वतंत्र आयोग हा अत्यावश्यकच होता, अशा शब्दात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे यांनी या आयोगाचे स्वागत केले असून राज्यातील आदिवासी विभागातील अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

### साकुर पठारात माजीमंत्री थोरातांचे मोठे काम

२०१२ मध्ये जिल्हा परिषद सदस्य मधून निवडून आल्यानंतर आमचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्वप्रथम मला बोलावून घेऊन साकुर पठारातील आदिवासी भागातील विविध वाड्यावास्त्या यांच्यामध्ये वीज, पाणी, लाईट, रस्ते यासाठी अधिक काम करण्यासाठी सूचना केल्या. २००९ पूर्वी हा विभाग अकोले विधानसभा मतदारसंघांमध्ये होता. त्यामुळे प्रलंबित कामे खूप होती. जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या विभागात आदिवासी वाडी विकास योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबवून अनेक विकासाच्या योजना मार्गी लावले असून माजी मंत्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम आजही सुरू असल्याचे ते म्हणाले.




महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात अनुसूचित जाती आणि जमातींसाठी स्वतंत्र आयोगावरील चर्चेत ते बोलत होते. आ. तांबे म्हणाले की, अनुसूचित जाती आणि जमातीसाठी स्वतंत्र आयोग हा अत्यंत गरजेचा होता. या विधेयकाचे मी स्वागत करत असून आदिवासी बांधवांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी हा आयोग काम करणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे,नंदुरबार या जिल्ह्यांसह चोपडा तालुका तसेच तापी खोऱ्यामध्ये आदिवासी बांधव मोठ्या संख्येने आहे. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, सटाणा, त्रंबकेश्वर या भागासह आमच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव राहत आहेत.

राज्यामध्ये विविध आयोगाच्या कामकाजाचे परीक्षण झाले पाहिजे महिला आयोगाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पुण्यामध्ये महिला असुरक्षित असून या आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण झाले आहेत.

आदिवासी विभागात परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. याचप्रमाणे आदिवासी आश्रम शाळा, वस्तीग्रह यांची परिस्थिती सुद्धा वाईट आहे. विद्यार्थ्यांना कोणत्याही सुविधा नाही. या सर्वांचे थर्ड पार्टी ऑडिट झाले पाहिजे. आदिवासी भागातील रस्ते आणि विकासाची कामे निकृष्ट दर्जाची होत असतात. या आयोगामार्फत अशा ठेकेदार, भ्रष्टाचारी अधिकारी या सर्वांवर कारवाई करण्याचा अधिकार दिला गेला पाहिजे.

फक्त सुनावण्या घेण्यासाठी आयोग नको असे सांगताना जल, जमीन, जंगल हा आपला अभिमान असून देशाच्या प्रगतीमध्ये १८ पगड जाती व बारा बलुतेदार यांचीही मोठे योगदान असून या सर्वांच्या विकासासाठी या आयोगामार्फत काम होईल असा विश्वास व्यक्त केला.

# रांधे येथे आषाढी एकादशी सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर-बेल्हा मार्गावरील वाघजाई फाटा पासून उत्तरेकडे २ किलोमीटर अंतरावर असणारे रांधे हे प्रसिद्ध तिर्थक्षेत्र असून येथे उद्या, दि. ५ रोजी वारकरी संप्रदायातील सर्वांत मोठी असणारी आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मंदिरात भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक व अखंड हरिनाम सप्ताहाचे प्रमुख दिलीप आवारी यांनी दिली आहे .

श्री क्षेत्र रांधे हे प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाते. इ. स. १६ व्या शतकात येथे श्री बाळोबा महाराज भाकरे हे थोर संत होऊन गेले. ते श्री विठ्ठलाचे परमभक्त होते. पंढरपूरची वारी नित्य नियमाने करत असत . परंतु वार्धक्यामुळे त्यांना वारीला जाणे शक्य नसल्याने त्यांना साक्षात पंढरीच्या श्री विठ्ठलाने श्री क्षेत्र रांधे गावातील विठ्ठलवाडीच्या टाकमुख येथे प्रत्यक्ष दर्शन दिले. त्यामुळे श्री क्षेत्र रांधे येथे श्री विठ्ठलाचे भव्य मंदिर आहे.

> श्री क्षेत्र रांधे येथील आषाढी एकादशी सोहळा यशस्वीपणे साजरा होण्यासाठी गावातील सर्वजण एक दिलाने काम करतात. या पवित्र अशा आषाढी एकादशी सोहळ्याचा सर्वांनी लाभ घ्यावा,
>
> **– दिलीप आवारी**



मंदिरातील श्री विठ्ठल रुख्मिणी मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना थोर संत श्री निंबराज महाराज दैठणकर यांच्या हस्ते करण्यात आली. रांधे येथे आषाढी एकादशी व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे ५ वाजता सरपंच संतोषराव काटे व त्यांच्या पत्नी व रोहिणी काटे आणि विशाल आवारी व श्रद्धा आवारी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुख्मिणी मूर्तीस अभिषेक होणार आहे.

सकाळी ११ ते २ या वेळेत रांधे, विठ्ठलवाडी, दरोडी, बाभुळवाडे, गारखिंडी, लोणी मावळा, अळकुटी, म्हस्केवाडी, वडनेर, येथील भाविक भक्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी दिंडी घेऊन येतात. आलेल्या सर्व भाविकांचे स्वागत रांधे ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येते.

### मंदिरात मोफत नेत्र तपासणी शिबीर

रांधूबाई देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष अनिल आवारी यांचा अभिष्टचिंतन व आषाढी एकादशीच्या निमित्ताने रांधे येथील स्वयंभू विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संगणकाव्दारे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले असून सर्व वारकरी भाविक भक्त व ग्रामस्थांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संदीप आवारी, किरण आवारी, गोकुळ आवारी व शशांक खोसे यांनी केले आहे.

# डायनॅमिकचा प्रद्युम्न ऑलंपियाडमध्ये राज्यात चौथा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : इंडियन टॅलेंट ऑलंपियाड परीक्षेमध्ये कर्जतमधील डायनॅमिक इंग्लिश स्कूलचा इयत्ता नववी मधील विद्यार्थी प्रद्युन्म विरेन राठोड याने उल्लेखनीय कामगिरी करत स्टेट टॉपर्स लिस्टमध्ये चौथा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल त्याला गोल्ड मेडल व धनादेश देऊन गौरविण्यात आले.



कर्जत तालुक्यातील डायनॅमिक इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. या स्पर्धेमध्ये डायनॅमिक स्कूलच्या एकूण सात विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल, दोन विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल आणि दोन विद्यार्थ्यांनी ब्राँझ मेडल मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले.

ही कामगिरी कर्जत तालुक्यासाठी गौरवाची बाब असून, शाळेतील गुणवत्ता आणि शिस्तबद्ध अभ्यासपद्धतीचे हे फलित असल्याचे पालक व शिक्षणवर्तुळातून सांगितले जात आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून प्रद्युन्मचे कौतुक

प्रद्युन्मच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य राजेशकुमार नम्बीयार, सद्गुरु सामविकास प्रतिष्ठाण कर्जतचे अध्यक्ष राजेंद्र फाळके, सचिव दामोदर अडसुळ आणि संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे विशेष कौतुक करत अभिनंदन केले.

# अक्षय वैद्य दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित



अहिल्यानगर : दिव्यांग जलतरणपटू अक्षय सुनील वैद्य याला माहेर संस्थेतर्फे राळेगणसिद्धी या ठिकाणी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते विशेष दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अक्षय वैद्य हा दिव्यांग जलतरणपटू असून, जलतरणमध्ये दिव्यांग गटातून विविध बक्षिसे पटकावली आहेत. तर समुद्रात देखील पोहण्याचा विक्रम त्याने केलेला आहे. तसेच कोरोना काळात केलेल्या समाज जागृतीचे कार्य आणि नुकतेच दिव्यांग मुलीशी विवाह करून समाजात एक वेगळा आदर्श निर्माण केला. या कार्याची दखल घेऊन माहेर संस्थेच्या वतीने अक्षय वैद्य याला विशेष दिव्यांग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी त्याचे विशेष कौतुक केले. या सन्मनाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ...दबावासमोर न झुकणारी संघटना : प्रा. चव्हाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : राज्यातील विरोधी पक्षाची भूमिका सध्या वंचित बहुजन आघाडीच प्रभावीपणे बजावत असून, इतर पक्षांनी सत्तेच्या दबावापुढे शरणागती पत्करल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य व राज्याचे उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांनी केली.

वंचित बहुजन आघाडी पाथर्डी शहर व तालुका बैठक राष्ट्रीय सदस्य तथा राज्य राज्य उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृहावर संपन्न झाली.

> वंचित बहुजन आघाडीने न डगमगता संघर्षाची भूमिका घेतली आहे. प्रत्येक गावात वंचित बहुजन आघाडीचे किमान ११ सक्रिय कार्यकर्ते तयार करून स्वाभिमानी युवकांची फौज उभी करण्याचा संकल्प केला. संघटनाशक्ती हीच खऱ्या अर्थाने परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. राज्यात वंचित चळवळीचा विस्तार करताना गावपातळीवर कार्यकर्त्यांची घडामोडी अधिक गतिमान करण्यावर भर दिला जाणार आहे.
>
> **– प्रा. किसन चव्हाण**



त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

याप्रसंगी अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अध्यक्ष योगेश साठे, पाथर्डी तालुका अध्यक्ष श्रीकांत पप्पूशेठ बोर्डे, तालुका महासचिव संजय कांबळे, शेवगाव तालुका अध्यक्ष शेख प्यारेलाल शेख, जिल्हा संघटक रवींद्र निळ, उपाध्यक्ष सुरेश जाधव, अरुण झांबरे, तालुकाध्यक्ष सुनिता जाधव, रोहिणी ठोंबे आदी उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले की, आज भारतीय जनता पक्षाला खऱ्या अर्थाने विरोध करणारा कोणी उरलेला नाही. काहीजण ईडी, सीबीआयच्या दबावाला बळी पडून सत्ताधाऱ्यांकडे गेले, तर काही थेट पक्षात सामील झाले. मात्र, यावेळी मन्सूर पठाण, गोरख म्हस्के, शंकर सिरसाठ, अरुण थोरात, सुनील जाधव, बाळासाहेब पंडागळे, महेंद्र राजगुरू, बाळदेव फुंदे, अनिल पवार, अनिता कांबळे, मिना शिंदे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आकाश शिंदे केले. तर आभार संजय कांबळे यांनी मानले.

# शिलाविहारात भागवत ग्रंथ पूजनाने कथेस प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात भागवत ग्रंथाचे पूजन करून कथेस प्रारंभ करण्यात आला.

पुणे येथील भागवताचार्य शिवगुरू विनायक पारखे शास्त्री यांच्या हस्ते भागवत ग्रंथाची विधिवत पूजा करण्यात आली. भागवत कथाकार शिवगुरु पारखे यांचा पुष्पहार अर्पण करून हभप सुंदरदास रिंगणे यांनी सन्मान केला. हभप रेखाताई रिंगणे, अशोक मुळे, राम विधाते भाविक उपस्थित होते. गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात भाविकांनी कथा श्रवणाचा लाभ घ्यावा. असे आवाहन सेवाभावी मंडळाच्या वतीने करण्यात आले. दररोज दुपारी ३ ते ६ ही कथा होणार आहे.



# आई-वडील हेच आपल्या यशाचे खरे मानकरी

## घनश्याम माने; मातोश्री राधा फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ


**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : आयुष्यात आपण कितीही मोठे व्हा, कितीही मोठ्या पगाराची नोकरी व्यवसाय, व्यवसाय करा, पण या यशामागील खरे मानकरी असलेले आई वडील, जिथे शिक्षण घेतले त्या शिक्षण संस्थेला कधीच विसरू नका, आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या घटकांची आठवण ठेवली पाहिजे, असे प्रतिपाद न करियर मार्गदर्शक घनश्याम माने यांनी केले.

ते मातोश्री राधा फार्मसी कॉलेज वीरगाव च्या विद्यार्थी निरोप समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी आनंदगड शैक्षणिक संकुलाचे सचिव अनिल रहाणे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, आरीफ तांबोळी, सचिन शिंदे, केरू वाकचौरे, अनिल डोळस, निलेश वाकचौरे, शिवराज वाकचौरे, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्रा. प्रतीक्षा रहाणे, भिलारे आदि उपस्थित होते.

> आनंदगडावर येणारा प्रत्येक जण आनंद घेवूनच जातो तोच आनंद घेवून आपण जात असला तरी आपल्या विरहाचे दुःख आम्हाला नेहमीच राहील. पक्षी घरटे सोडून विहार करतात. तसे आपण आपल्या भविष्यासाठी या घरट्यातून बाहेर पडत आहात. पण या घरट्याचे दरवाजे तुमच्यासाठी नेहमी खुले असतील.
>
> **– अनिल रहाणे**

मातोश्री राधा फार्मसी कॉलेजच्या चतुर्थ वर्ष बी फार्मसी व द्वितीय वर्ष डी फार्मसीच्या कॅम्पस इंटरव्यूमध्ये निवड झालेल्या ३५ विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. डिप्लोमा व डिग्री अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य मिळविलेल्या व आदर्श विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




प्रा. मनिषा शेरमाळे, प्रा प्रवीण शेळके, प्रा. कनकधर अभिलाष, प्रा. वैभव गाढवे, प्रा. कल्याणी म्हैसमाळे, प्रिया आंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक प्रा. रेश्मा आढळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऋतुजा भांगरे यांनी केले. यावेळी प्रा. मयुरी मुंढे, काजल धुमाळ, प्रा. आकाश इंद्रेकर, प्रा.सोनाली भांगरे, उर्मिला मिंढे, विद्या वाकचौरे, रोहिणी निकम, सुधीर गांडोळे, राहुल तोरमल, कामिनी देशमुख, आगिवले आदि उपस्थित होते.

# वृक्षाच्या रुपाने जवानांच्या स्मृती हिवरेबाजारमध्ये राहणार

## पद्मश्री पोपटराव पवार; एक पेड शहिदों के नाम उपक्रमाद्वारे वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहीद जवानांच्या स्मृती कायम वृक्षाच्या रुपाने हिवरेबाजारमध्ये राहणार आहे. शहीद जवानांचे बलिदान प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानास्पद व स्फुर्ती देणारे असल्याचे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरच्या माध्यमातून आदर्श गाव हिवरेबाजार येथे एक पेड शहिदों के नाम अभियान राबविण्यात आले. शहीद सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ झाडे लावून त्यांच्या आठवणी जिवंत ठेऊन भावी पिढीला देश निष्ठेची प्रेरणा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



वृक्षारोपण अभियानाप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुभाष गर्जे, वीर माता गोधाबाई नरवडे, सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, कुलकर्णी, चंद्रकांत शिंदे, चंद्रकांत भगत, त्रिदल सैनिक संघटनेचे अध्यक्ष गोवर्धन गर्जे, संजय म्हस्के, जय हिंदचे शिवाजी गर्जे, भगवान डोळे, एकनाथ माने, उद्योजक अंबादास कांडेकर, निवृत्ती भाबड, अशोक मुठे आदी उपस्थित होते. पद्मश्री पवार म्हणाले की, हिवरे बाजारमध्ये शहिद जवानांच्या स्मरणार्थ ५१ पिंपळाची झाडांची लागवड करण्यात आल्याचे सांगून, त्यांनी जय हिंदच्या कार्याचे कौतुक केले. आभार मेजर एकनाथ माने यांनी मानले.

# मुख्याधिकारी साहेब, शारदानगर परिसरातील समस्या सोडवा

## प्रभाग क्र. ४ मधील शारदानगर परिसरातील समस्यांबाबत नागरिकांचे नगरपरिषदेला साकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरातील शारदानगर परिसरात सांडपाणी, अपूर्ण रस्ते, स्वच्छतेचा अभाव आणि डासांच्या वाढलेल्या साम्राज्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या समस्यांबाबत नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्र. ४ मधील शारदानगर येथील रहिवासी डॉ. कुणाल घायतडकर, अमोल गिरमे व स्थानिक नागरिकांनी कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुहास जगताप यांना निवेदन देवून समस्या सोडविण्याबाबत साकडे घातले आहे.

> प्रभाग क्र. ४ च्या अंबिकानगर परिसरातील अंतर्गत रस्ते व गटार मंजूर असूनही हे काम अपूर्ण आहे. रस्ते व गटारीचे काम न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर समस्यांना सामोरे जावे लागत असुन ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे.
>
> **– अमोल गिरमे**

दिलेल्या निवेदनात शारदानगरच्या रहिवाशांनी असे म्हटले आहे की, शारदानगर भागातील नाल्यांची दुरावस्था झाल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने नाल्यांची साफ सफाई करावी. एस. एस. जी. एम. कॉलेजच्या मागील बाजूस साचलेल्या सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून निचरा होण्यासाठी योग्य उपाय योजना कराव्या. श्री देवी मंदिर आणि श्री दत्त मंदिर परिसर स्वच्छ करून कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी.



आ. काळे यांनी प्रभाग क्र. ४ मधील शारदानगर परिसरातील श्री नगर, शारदा नगर, एस. एस. जी. एम. महाविद्यालय रोड, मधील रस्त्यांना निधी देवून या रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत परंतु अद्यापही या रस्त्यांची कामे संबंधित ठेकेदाराकडून सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे या रस्त्यांची कामे त्वरित सुरु करावीत. काही रस्त्यांची अवस्था खूपच खराब झाली असून नागरिकांना रोजच्या दैनंदिन वापरात असेलेल्या रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे नागरीकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याने जंतुनाशक औषध फवारणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

नगरपरिषद प्रशासनाने नागरीकांच्या अडचणींची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी डॉ. कुणाल घायतडकर व शारदानगरच्या रहिवाशांनी मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्याकडे केली. यावेळी आण्णासाहेब शिंदे महाराज, अशोकराव नरोडे, संजय थांगे, अशोक टेंबरे, बाबुराव कुटे, दिग्विजय शेळके, एकनाथ चव्हाण, नेहा शिंदे, प्रतिक्षा पारळकर हसन शेख, ओंकार ठोंबरे, निखिल मढवई, लतीफ शेख, राजेंद्र सूर्यवंशी, मनोज देवठाक, दत्तू पवार, अशोक आवारे, बबनराव आभाळे, शेरू शेख, राजेंद्र निकम, ए. आर. औताडे, मच्छिंद्र गोर्डे, सुरेश मोरे, संजय नळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शाळा परिसरात तंबाखू विक्रीवर पथकाची नजर

## तालुकास्तरावर प्रथमच स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्याचा निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील अनेक शाळांच्या परिसरात सर्रासपणे तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असून, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन अधिनियम-२००३ नुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे.



या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरावर प्रथमच स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

### तंबाखुमुक्त शाळा धोरण?

शाळांना तंबाखूमुक्त करण्यासाठी विशेष धोरणे आखण्यात आली आहेत. या धोरणांनुसार, शाळा परिसरात तंबाखूचे सेवन किंवा विक्री पूर्णपणे प्रतिबंधित आहे. शाळांनी आपल्या आवारात तंबाखूविरोधी फलक लावणे, दुष्परिणामांबद्दल माहिती देणे बंधनकारक आहे.

गेल्या वर्षभरात शहरात शाळा परिसरात तंबाखू विक्रीसंदर्भात ४४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. अनेक विक्रेते कायद्याची पर्वा न करता बिनधास्तपणे आपला व्यवसाय करत असल्याचे चित्र आहे. यासाठी प्रशासनाने कठोर धोरण आखले असून, तालुकास्तरावरील भरारी पथक लक्ष ठेवणार आहे. तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकांचीही जबाबदारी आहे. यापूर्वी जिल्हास्तरावरील एकच पथक जिल्ह्यातील सर्व शाळा परिसरातील तंबाखूजन्य पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करत होते. आता शासनाने तालुकास्तरावर प्रथमच भरारी पथक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या तहसीलदार पथकाचे अध्यक्ष, तालुका आरोग्य अधिकारी, सदस्य सचिव, तर सदस्यांमध्ये ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, स्वयंसेवी संस्था आणि तालुका पोलिस निरीक्षक यांचा समावेश आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम हा केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने सुरू केलेला एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश तंबाखूच्या वापरामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक दुष्परिणामांबद्दल जनजागृती करणे, तंबाखू नियंत्रणासाठी कायदेशीर उपाययोजना करणे आणि तंबाखूमुक्त समाज निर्माण करणे हा आहे.

# साखर कामगार वेतनवाढ लांबणीवर

## त्रिपक्ष समितीला मिळाली मुदतवाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : महाराष्ट्रातील साखर उद्योग व जोडधंद्यातील कामगारांना वेतनवाढ व इतर सेवाशर्ती लागू करण्यासाठी डिसेंबर २०२४ मध्ये त्रिपक्ष समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने सहा महिन्यांत वेतनवाढीचा निर्णय घेणे अपेक्षित होते. या कालावधीत समितीच्या चार बैठका झाल्या, परंतु ठोस निर्णय न झाल्याने साखर कामगारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, या समितीला पुन्हा मुदतवाढ मिळाली आहे. मागील वेतनवाढ कराराची मुदत संपून सोळा महिन्यांचा कालावधी लोटला. त्रिपक्ष समितीच्या चार बैठका झाल्या. समितीची चौथी बैठक १३ जूनला झाली. त्यामध्ये वेतनवाढीचा निर्णय माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या कोर्टात ढकलला आहे. मागील वेतनवाढ कराराची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली. त्यामुळे राज्यातील सर्व साखर कामगार संघटनांनी एकत्र येत लढा देऊन वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये त्रिपक्ष समिती गठीत केली. आता त्रिपक्ष समितीला तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.



सर्व ठिकाणी महागाई वाढते. इतर उद्योगांतील कामगारांना भरीव पगारवाढ मिळते. परंतु साखर उद्योग नेहमीच आर्थिक अडचणीत असल्याचे सांगून कामगारांना सक्तीचे रजेवर पाठवणे किंवा पगार कपात करण्याचे प्रस्ताव बहुतेक कारखाने देतात. त्यामुळे साखर उद्योगाकडे नोकरी करण्यासाठी नवीन पिढीने पाठ फिरवली आहे. सध्या काम करत असलेल्या एक लाख कामगारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

त्रिपक्ष समितीने साखर कारखाना व्यवस्थापनाकडून साखर कामगार पगार खर्च वार्षिक उलाढालीच्या किती टक्के आहे. कामगारांचा पगार ऊस गाळपाच्या प्रतिटन किती टक्के आहे, अशी माहिती मागवली आहे. साखर कामगार संघटना व त्रिपक्षीय समिती बैठकीत झालेल्या चर्चेनंतर कामगार संघटनेने २८ टक्के वेतनवाढीचा सुधारित प्रस्ताव समितीला सादर केला आहे. त्यामुळे १३ जूनच्या बैठकीत सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा फोल ठरली. २८ टक्के वेतनवाढीचा सुधारित प्रस्ताव समितीला सादर केला आहे.

# कोठारी यांचे कार्य उल्लेखनीय: तहसीलदार गणेश माळी

**जनता आवाज वृतसेवा**

**जामखेड** : वृक्ष लागवडीतून वेगळा संदेश देणारे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांचे कार्य उल्लेखनीय असून ते सतत अशा सामाजिक कार्यात सहभाग घेतात, अशी उद्गार तहसीलदार गणेश माळी यांनी व्यक्त केले. जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली आणि कोठारी प्रतिष्ठान जामखेड व वन विभाग जामखेड च्या संयुक्त विद्यमानाने सालाबाद प्रमाणे सौताडा घाटामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामखेडचे तहसीलदार गणेश माळी, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्धवबाप्पू देशमुख, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, डॉक्टर भरत दारकुंडे



नरेंद्र गांगुली, डॉक्टर सुनील कटारिया, उद्योजक कांतीलाल कोठारी, युवराज पोकळे, दीपक भोरे, अमोलक जैन, विद्या प्रसारक मंडळाचे सुप्रिडेंट सोभाचंद ललवाणी आदी उपस्थित होते. माळी म्हणाले, जैन कॉन्फरन्स आणि कोठारी प्रतिष्ठान वनविभाग मार्फत सालाबादप्रमाणे आज कार्यक्रम घेण्यात आला.

संजय कोठारी यांचे कार्य मी गेली दोन वर्षापासून पाहत आहे. खरोखर समाजसेवेत त्यांना आवड आहे. प्रत्येक कामात हे अग्रेसर असतात प्रशासनाला मदत करत असतात अपघातातील लोकांना वाचवणे त्यांचे मोठे कार्य आहे.

### १४ हजार झाडांची केली लागवड

संजय कोठारी म्हणाले गेले ३० वर्षापासून वृक्षारोपण काम करत आहेत तसेच संगोपन सुद्धा ते करत आहेत आत्तापर्यंत त्यांनी १४०००(चौदा हजार)झाडे लावले असून या वर्षी साधारण ५०० वृक्ष लावण्याची मानस आहे जामखेड येथील जैन कॉन्फरन्स दिल्ली,कोठारी प्रतिष्ठाण आणि वनविभाग माध्यमातून जामखेड बीड रस्त्यावरील सौताडा घाट परिसररात वृक्ष लावून लागवड केली असून आपण संगोपनाची जबाबदारी घेत आहोत असे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी व्यक्त केले.

# महिलांची मोफत आरोग्य तपासणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात महिलांची विविध आरोग्य तपासणी करुन त्यांना आरोग्यावर मार्गदर्शन करण्यात आले. जयश्री नर्सिंग होम (भागीरथी हॉस्पिटल), स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ तसेच धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या शिबिरास पंचक्रोशीतील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी स्त्री रोग तज्ञ डॉ. जयश्री रौराळे, डॉ. विजय जाधव, एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, नामदेव फलके, माजी सरपंच रुपाली जाधव, लता कापसे, संदीप साळवे, दिलीप खरात आदींसह महिला उपस्थित होत्या.

# 'आरोपींना तात्काळ अटक करावी'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राष्ट्रवादीचे आ. संग्राम जगताप यांना धमकी देणाऱ्या दौंड येथील बादशाह या नावाच्या व्यक्तीला तातडीने पोलिसांनी अटक करावी, अन्यथा जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकवण्याचे काम केले जाईल. आ. जगताप यांना पोलिस संरक्षण मिळावे, अशी मागणी नगर शहरा राष्ट्रवादीच्यावतीने पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विनीत पाऊलबुद्धे, अविनाश घुले, अजिंक्य बोरकर, आशाताई निंबाळकर, माणिक विधाते, बाळासाहेब पवार, सुरेश बनसोडे, दिपक खेडकर, रेश्मा आठरे, सागर बोरुडे, साधनाताई बोरुडे, मयुर बांगरे, लतिका पवार, युवराज शिंदे, सनी कोवळे, नितीन घोडके, राजेश भालेराव, श्रेणिक शिंगवी, गिरीश जगताप, महेश गलांडे, अंजली आव्हाड, धीरज उकिर्डे, मारुती पवार, सुंनदा शिरवळे आदी उपस्थित होते.

# तळेगाव-नांदूर शिंगोटेत जुगार अड्ड्यावर छापा

## १४ आरोपी ताब्यात; ११ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तळेगाव दिघे ते नांदूर नांदर शिंगोटे रस्त्यावर बांधकाम चालू असलेल्या घराच्या आडोशाला हारजितीचा तिरट जुगार अड्ड्यावर गुरुवारी (दि.३) अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टकात १४ आरोपी जेरबंद करुन ११ लाख २४ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामुळे अवैध धंदेचालकांत एकच खळबळ उडाली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.



त्यानुसार अवैध धंद्यांची माहिती काढत असताना तळेगाव दिघे ते नांदूर शिंगोटे रस्त्यालगत एक इसम बांधकाम चालू असलेल्या घराचे आडोशाला तिरट नावाचा हारजितीचा जुगार खेळत व खेळ-वत असल्याची माहिती मिळाली.

त्यानंतर पथकाने छापा टाकला असता तेथे अजीज अबू शेख (वय ४५, रा. तळेगाव दिघे), आकाश बाबासाहेब गडाख (रा. पारेगाव बुद्रुक), योगेश दत्तात्रेय रहाटळ (रा. चिंचोली गुरव), भास्कर बाबुराव पगार (रा. चिंचोली गुरव), महेंद्र सुंदरलाल पाटणी (रा. तळेगाव दिघे), कैलास कारभारी मळे (रा. काकडवाडी ता. संगमनेर), नंदू म्हतु पिंगळे (रा. तळेगाव दिघे), इरफान यूनिस शेख (रा. लोणी, हसनापूर ता. राहाता), असीफ कासम शेख (रा. करुले), रवींद्र विठ्ठल जेजूरकर (रा. ममदापूर, ता. राहाता), एकनाथ रोहिदास जोर्वेकर (रा. पारेगाव), विलास भास्कर जगताप (रा. तळेगाव दिघे), दशरथ बिरु कांदळकर (रा. वडझरी बुद्रुक), विजय रंभाजी ढवळे (रा. पारेगाव बुद्रुक) यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्याकडून जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य, रोख रक्कम, १३ मोबाईल, ९ मोटारसायकल असा ११ लाख २४ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या सर्वांविरुद्ध पोकॉ. रमीझराजा अत्तार यांनी संगमनेर तालुका पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

# पिकविमा योजना फसवी ठरणार: निर्मळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राज्य सरकारने एक रुपयातील पिकविमा योजना बंद करून संकट काळात सर्वाधिक नुकसान भरपाई मिळवून देणारे ट्रिगर रद्द करत केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई देणारी सुधारित पीकविमा योजना सुरू केली आहे. या नव्या योजनेत शेतीचे नुकसान झाल्यास भरपाई मिळण्याची संधी खूपच कमी असल्याने ही योजना शेतकऱ्यांसाठी घातक ठरणारी आहे. सरकारने आपत्ती काळात वरदान ठरणारे ट्रिगर सुरू ठेवावेत, अशी मागणी पिंपरी निर्मळ येथील प्रगतिशील शेतकरी राजेंद्र निर्मळ यांनी केली आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना वरदान ठरणारी एक रुपयात पिकविमा योजना सुरू केली होती. पावसातील खंड, वाऱ्याचे वादळ, काढणी पश्चात नुकसान या ट्रिगरमुळे पिकाच्या कोणत्याही स्टेजवर नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून परतावे मिळत होते. याचा फायदा पाऊस लहरी झालेला आहे. नवीन




नव्या योजनेत हे तीनही ट्रिगर रद्द करण्यात आले असून केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई मिळणार आहे. तर दुसरीकडे ट्रिगर कमी करून पिक विम्याचा हप्ताही मोठ्या प्रमाणात वाढवून शेतकऱ्यांची दुहेरी फसवणूक केली आहे. विम्याचा हप्ता वाढवला तरी चालेल परंतु शेतकऱ्यांना वरदान ठरणारे ट्रिगर बदलू नयेत, अशी मागणी येथील राजेंद्र निर्मळ यांनी केली आहे.

योजनेत कापणी प्रयोगातून विम्याचे परतावे देताना महसुल मंडळ निहाय पीक कापणी प्रयोग होतात. त्यामुळे महसूल मंडळातील एखाद्या दोन गावात अतिवृष्टी झाल्यास किंवा पावसाने उघडीप दिल्यास शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होऊनही त्यांना इतर गावातील चांगल्या पिकांमुळे मदत मिळणार नाही. त्यामुळे शेतकरी वर्गावर अन्याय होणार आहे.

# अंशकालीन महिला परिचर संपावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्ह्यातील आरोग्य उपकेंद्रात व प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवारत अंशकालीन महिला परिचर यांच्या किमान वेतन व प्रलंबित प्रश्नावर अनेकवेळा मागण्या आंदोलने करुन कुठलीच दखल घेतली



जात नसल्याने जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रातील महिला परिचरांनी १ जुलै पासून बेमुदत कामबंद करुन संप पुकारला आहे. या संपाबाबत जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले, राज्यस्तरीय प्राथमिक आरोग्यकेंद्र व उपप्राथमिक केंद्रात सेवा देणाऱ्या अंशकालीन महिला परिचर, दुर्गमभागात काम करणाऱ्या आदिवाशी, निराधार, विधवा, परित्यक्त्या महिला काम करीत आहेत. अत्यल्प मानधन व असुरक्षित कामाच्या बाबतीत तसेच इतर मागण्यासाठी आंदोलने मोर्चे काढुन सरकारकडे मागण्या केल्या. परंतु कुठलीच दखल घेतली जात नाही. १९६६ सालापासून महिला परिचर सेवा देत आहेत. मात्र नाममात्र दरमहा ३००० रुपये म्हणजे १०० रुपये प्रमाणे रोज मिळतो. नाव फक्त अर्धवेळ, मात्र पूर्ण वेळ काम करावे लागते. यात लसीकरण, प्रसुती, सफाई, तपासण्या आदी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तरीही त्यांना अंशकालीन गटात गणले जाते. त्यांना किमान वेतन लागु करावे, अंशकालीन पदनाम हटवुन नियमित सेवेत घ्यावे, दरवर्षी गणवेश व भाऊबीज मिळावी, अपघात विमा मिळावा तसेच मानधन वाढ व नियमित मानधन मिळावे, बायोमेट्रिकची सक्ती करु नये, तसेच कोविड काळात जीव धोक्यात घालून काम केले त्याचा मोबदला अशा मागण्या करण्यात आल्या आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## उत्सवात साईभक्तांनी सहभागी व्हावे : गोरक्षनाथ गाडीलकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या वतीने बुधवार दि. ९ ते शुक्रवार दि. ११ जुलै या काळात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा होत असून या उत्सवात सर्व साईभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे. गुरु-शिष्य परंपरा फार प्राचीन आहे. आपल्या गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आषाढी पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. साईबाबांच्या हयातीतही गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात असे. त्यामुळे या दिवसाला आजही अनन्यसाधारण महत्त्व आहे.



साईबाबांवर श्रद्धा असणारे असंख्य भाविक दरवर्षी गुरुपौर्णिमेला शिर्डीला येऊन समाधीचे दर्शन घेतात. उत्सवानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शुक्रवार दि. ९ जुलै रोजी पहाटे ५.१५ वाजता श्रींची काकड आरती, ५.४५ वाजता श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, ६ वाजता व्दारकामाई श्री साईसच्चरिताचे अखंड पारायण सुरू होईल, ६.२० वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ७ वाजता श्रींची पाद्यपूजा, दुपारी १२.३० वाजता श्रींची माध्यान्ह आरती, दुपारी १.३० ते ३.३० निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम, सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कीर्तन होणार आहे.

सायं. ७ वाजता श्रींची धुपारती होईल. रात्री ९.१५ वाजता श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक होणार असून पालखी मिरवणूक परत आल्यानंतर रात्री १० वाजता श्रींची शेजारती होईल. या दिवशी पारायणासाठी व्दारकामाई रात्रभर उघडी राहील. उत्सवाच्या सांगता दिनी शुक्रवार ११ जुलै, पहाटे६ वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ६:५० वाजता श्रींची पाद्यपूजा, सकाळी ७ वाजता गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक होणार असून सकाळी १० ते १२ दरम्यान गोपालकाला कीर्तन व दहिहंडीचा कार्यक्रम होणार आहे.

### उत्सवाच्या मुख्यदिनी होणारे कार्यक्रम

गुरुवारी मुख्य दिवशी दि. १० जुलै रोजी पहाटे ५.१५ वाजता श्रींची काकड आरती, ५:४५ वाजता अखंड पारायणाची समाप्ती व श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, ६:२० वाजता श्रींचे मंगलस्नान व दर्शन, सकाळी ७ वाजता श्रींची पाद्यपुजा, सकाळी १० ते १२ कलाकारांचे कार्यक्रम, दुपारी १२:३० वाजता श्रींची माध्यान्ह आरती व सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कीर्तन होईल. सायंकाळी ७ वाजता श्रींची धुपारती होईल. रात्री ९:१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघणार आहे. हा उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे राहणार आहे.




# जान्हवीने केले घायाळ



बॉलिवूडच्या स्टायलिश अभिनेत्रींच्या यादीमध्ये जान्हवी कपूरचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कामामुळे तसेच लूकमुळे ती नेहमीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसते. अलिकडेच लंडनमधील 'मिउ मिउ' च्या नवीन स्टोअर लाँचमध्ये तिच्या ग्लॅमरस उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिया कपूरने स्टाइल केलेली जान्हवी नेव्ही ब्लू ड्रेस आणि न्यूड सॅटिन ब्रॅलेटमध्ये खूपच सुंदर दिसत होती. तिचे फोटो सोशल मीडियावर पसंती मिळवत आहेत.

जान्हवी कपूरने लंडनमधील न्यू बॉन्ड स्ट्रीटवरील मिउ मिउ च्या नवीन फ्लॅगशिप स्टोअरच्या भव्य उद्घाटनाला हजेरी लावली होती. या कार्यक्रमासाठी तिने मिउ मिउ ची सिग्नेचर स्टाइल स्वीकारली. अर्थातच यातील तिचा खेळकर, स्टायलिश आणि थोडा बंडखोर लूक सगळ्यांनाच भावला. तिच्या आउटफिटमध्ये नेव्ही ब्लू निट ड्रेस होता आणि त्याखाली सॅटिन ब्रॅलेट दिसत होते. 'इनरवेअर अ‍ॅज आउटवेअर' ट्रेंडचा हा एक धाडसी दृष्टिकोन म्हणायला हवा आणि हीच मिउ मिउची खास शैली आहे.

जान्हवीने गुडघ्यापर्यंत उंच चमकदार मोजे, काळे लोफर्स आणि काळ्या बकेट हॅटने आपला लूक पूर्ण केला. तिने कॅज्युअली फर स्टोल देखील घातला ज्यामुळे तिचा संपूर्ण लूक विंटेज आणि मॉडर्नचा परिपूर्ण संगम झाला. सॉफ्ट ग्लॅम मेकअप आणि मोकळ्या केसांसह जान्हवीने पायऱ्या आणि हॉटेलच्या बेडवर अशी पोज दिली की जणू ती जागा स्वतःच्या मालकीची आहे. थोडक्यात, तो फक्त एक पोशाख नव्हता तर सहज आणि उत्साही मूड होता, असेच म्हणावे लागेल.

जान्हवीला तिची चुलत बहीण आणि स्टायलिस्ट रिया कपूरने स्टायल केले होते. हा लूक सामान्यतः चांगला मानला जात नसे. परंतु मिउ मिउ च्या कल्पकतेमुळे त्याला एक स्टायलिश अंदाज मिळाला असून आता तो डिझायनरच्या पसंतीचा ठरत आहे. रियाने इन्स्टाग्रामवर जान्हवीचे फोटो शेअर केले असून त्यात ती कार्यक्रमासाठी तयार होताना दिसत आहे.

फॅशन व्यतिरिक्त जान्हवी तिच्या प्रोजेक्ट्ससाठी देखील चर्चेत आहे. लवकरच ती सिद्धार्थ मल्होत्राबरोबर 'परम सुंदरी'मध्ये दिसणार आहे. ही केरळच्या बॅकवॉटरवर आधारित क्रॉस-कल्चरल प्रेमकथा असून चित्रपट २५ जुलै २०२५ रोजी प्रदर्शित होईल. याशिवाय ती सनी लिओनीच्या 'तुलसी कुमारी'मध्ये वरुण धवन, रोहित सराफ, सान्या मल्होत्रा आणि मनीष पॉल यांच्यासोबत दिसणार आहे.

# रश्मिकाने जोडीदार शोधला?





अभिनेत्री रश्मिका मंदान्ना आगामी 'कुबेरा' मध्ये दिसणार आहे. यामध्ये ती अभिनेता धनुष आणि नागार्जुनसोबत पडदा शेअर करणार आहे. अलिकडेच एका भव्य कार्यक्रमात चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला. त्यावेळी रश्मिकाने अनेक मनोरंजक गोष्टी शेअर केल्या. यावेळी तिला कथित बॉयफ्रेंड विजय देवरकोंडाबद्दल देखील विचारण्यात आले. मात्र तिच्या एका उत्तराने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. तसे पाहायला गेले तर रश्मिका आणि विजयच्या कथित अफेअरच्या बातम्या दररोजच चर्चेत असतात. मनोरंजक गोष्ट अशी आहे की, आतापर्यंत दोघांनीही अशा बातम्यांवर मौन बाळगले आहे. त्यामुळे लोक केवळ अंदाज बांधत आहेत.

कार्यक्रमात रश्मिकाला विचारले गेले की, ती प्रत्येकाच्या कोणत्या गुणांची कॉपी करू इच्छिते? दिलेल्या यादीमध्ये धनुष, नागार्जुन अक्किनेनी आणि रश्मिकाचा 'पुष्पा २' मधील सह-अभिनेता अल्लू अर्जुन अशी नावे समाविष्ट होती. त्यावर उत्तर देताना तिने यादीतील नावे बाजूला ठेवत विजयचे प्रत्येक गुण अंगीकारायचे आहेत, असे उत्तर देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विजय देवरकोंडाचा प्रत्येक गुण सगळ्यांनी अंगिकारण्यासारखा आहे, असेही ती म्हणाली.

काही काळापूर्वी 'फिल्मफेअर'साठीच्या एका मुलाखतीत विजय देवरकोंडाला विचारण्यात आले होते की, त्याला भावी पत्नीमध्ये कोणते गुण हवे आहेत. यावर, अभिनेत्याने उत्तर दिले होते की तो सध्या जीवनसाथी शोधत नाही. पण आता रश्मिकाने मात्र जीवनाचा जोडीदार म्हणून त्याला निवडले असल्याचे अनेकांचे मत आहे. अर्थात काहीही असले तरी तूर्तास तरी 'कुबेरा'ला प्रेक्षक कसे स्विकारतात हे बघणे गरजेचे आहे.

# लवकरच मिळेल गोड बातमी



अभिनेत्री कियारा अडवाणी लवकरच आई होणार आहे. पती आणि अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रासोबत लग्नाच्या दोन वर्षांनंतर ती पहिल्या बाळाचे स्वागत करणार आहे. सध्या हे जोडपे आपला प्रत्येक क्षण खास बनवताना दिसत आहे. अलीकडेच कियाराने बेबी शॉवरची झलक दाखवली असून ती सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली आहे. चाहते तिच्या या फोटोला मोठ्या प्रमाणात लाईक्स देत आहेत.

फादर्स डेच्या निमित्ताने, कियाराने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनेक फोटो शेअर केले होते. त्यापैकी एक तिच्या बेबी शॉवरचा देखील होता. या फोटोमध्ये कियारा सिद्धार्थसोबत केक कापताना दिसून असून केकवर 'ओह बेबी' लिहिलेले आहे. केक खूप सुंदर आहेच त्याचबरोबर शेजारी सुंदर फुले देखील ठेवलेली दिसतात. मागील सजावटही लक्षवेधी आहे.

कियाराच्या चेहऱ्यावरील तेज अगदी पाहण्यासारखे आहे. दोघेही केक कापण्यापूर्वी डोळे मिटून प्रार्थना करताना दिसत आहेत. कियाराने या खास दिवसासाठी पिवळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. चाहत्यांना कियाराचा हा फोटो खूप आवडला असून ते येणाऱ्या सुंदर क्षणांसाठी जोडप्याला शुभेच्छा देत आहेत. कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्राने मोठ्या थाटामाटात लग्न केले होते. लग्नापूर्वी बराच काळ ते एकमेकांना डेट करत होते. आता हे जोडपे पालक होण्यास सज्ज तसेच खूप उत्सुक आहे. तेव्हा त्यांच्याकडून कधी गोड बातमी मिळते ते पाहू या.

# मनोरंजनाचे चौकार-षटकार



तो गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लोकांचे मनोरंजन करत आहे. टीव्हीवर राज्य केल्यानंतर त्याचा शो ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवरही यशस्वी ठरला आहे. तीन यशस्वी सीझननंतर आता 'द ग्रेट इंडियन कपिल शो' चा चौथा सीझन ओटीटीवर सुरू होणार आहे. याद्वारे नवज्योत सिंग सिद्धू सहा वर्षांनी पुनरागमन करत आहेत. विशेष म्हणजे ते अर्चना पुरण सिंगसह जज म्हणून शोमध्ये सामील होणार आहे. कपिल शर्माच्या शोच्या पहिल्या भागात सलमान खान पाहुणा म्हणून दिसणार असून त्याचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर लीक झाला आहे. कॉमेडी शो प्रेमी सिद्धूच्या पुनरागमनाबद्दल खूप उत्सुक आहेत. अर्चना पुरण सिंग हसताना आणि गप्पा मारताना दिसताना मात्र सिद्धू पाजी उत्तमोत्तम कविता आणि मजेदार शैलीने सर्वांचे मनोरंजन करतात, असे त्यांचे चाहते सांगतात.

सोशल मीडियावरील वापरकर्ते अर्चना आणि सिद्धूपैकी कोण शो साठी जास्त फी घेते, हा प्रश्नही विचारत आहेत. अर्चना पुरण सिंग यांनी आत्तापर्यंत अनेक कॉमेडी शो जज केले आहेत. लाफिंग क्वीन अर्चना एका एपिसोडसाठी सुमारे १० ते १२ लाख रुपये घेते. यावरुनच शोच्या बजेटची कल्पना येऊ शकते.

कपिल शर्माच्या शो मधील सिद्धू पाजी यांचे काही जुने एपिसोड अजूनही चर्चेत आहेत. त्यांची अनोख्या शैली आणि कपिलची निवेदनाची मजेदार पद्धत हे दोन्ही प्रेक्षकांना भावले आणि शो ला भरपूर प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे आता पुन्हा एकदा शोमध्ये परतत असल्यामुळे पुर्वीसारखे वातावरण पाहता येईल, असा प्रेक्षकांना विश्वास आहे. सिद्धू पाजी कपिलच्या शो प्रति एपिसोड ३० ते ४० लाख रुपये घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# 'हाऊसफुल ५' चा बोलबाला

प्रत्येक प्रकारची भूमिका अतिशय उत्तम प्रकारे साकारणाऱ्या निवडक कलाकारांच्या यादीत अक्षय कुमारचे नाव समाविष्ट आहे. कॉमेडी शैलीतील त्यांच्या काही हिट फ्रँचायझी चित्रपटांचा उल्लेख अनेकदा केला जातो. यामध्ये 'हाऊसफुल' चाही समावेश आहे. नुकताच साजिद नाडियाडवालाच्या



या हिट फ्रँचायझी चित्रपटाचा पाचवा भाग प्रदर्शित झाला. यावेळी निर्मात्यांनी हा चित्रपट एका नवीन योजनेसह बॉक्स ऑफिसवर आणला. स्वाभाविकच याची प्रचंड चर्चा झाली आणि मोठ्या कलाकारांच्या सहभागामुळे कलेक्शनवरही मोठा परिणाम झाला.

'हाऊसफुल ५' मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख आणि अभिषेक बच्चन यासारखे मोठे स्टार मुख्य भूमिकेत आहेत. कथेत एक मोठा ट्विस्ट येतो, जेव्हा तिघेही जॉलीच्या वेशात जहाजावर पोहोचतात आणि स्वतःला खरा जॉली म्हणवतात. यानंतर विनोदी प्रवास सुरू होतो आणि अ‍ॅक्शनने भरलेला हा चित्रपट लोकांना मनमुराद हसवण्याच्या अनेक संधी देतो. तथापि, काही लोकांनी त्यावर अश्लीलता पसरवण्याचा आणि मुलींना वस्तू म्हणून सादर केले असल्याचा आरोप केला आहे. अर्थातच दिग्दर्शक तरुण मनसुखानी यांनी, लोकांचा दृष्टिकोन असा आहे की, त्यांना यावरच अधिक लक्ष केंद्रित करायचे आहे... असे म्हणत आरोप फेटाळून लावले आहेत.

थोडक्यात प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळत असला तरीही कलेक्शनच्या बाबतीत चित्रपट सातत्याने पुढे जातो आहे. पहिल्या दिवशी त्याने भारतात २४ कोटींनी सुरुवात केली. त्यानंतर सलग दोन दिवस ३० कोटींहून अधिक कमाई केली. आठवड्याच्या शेवटी पुन्हा एकदा चित्रपटाच्या कमाईचा आलेख वरच्या दिशेने जाताना दिसला.

रविवारी त्याने पूर्ण ताकद दाखवली. शनिवारी चित्रपटाने भारतात ९.५ कोटींची कमाई केली. वीकेंड संपल्यानंतरही हा सिलसिला सुरू आहे. त्यामुळेच चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली असून एकूण कलेक्शनने १५० कोटींचा आकडा ओलांडला आहे. या लोकप्रिय चित्रपटाने पहिल्या १० दिवसांमध्येच भारतात १५० कोटींहून अधिक कमाई केली असल्याचे कळते. त्यामुळेच येत्या काळात कमाई किती वाढते हे पाहणे रंजक ठरेल.




# मरणाने अकाली गाठले

अभिनेत्री करिश्मा कपूरने पती संजय कपूरशी घटस्फोट घेतला असला तरी त्यांच्या अचानक निधनाने तिच्यासह सर्वांनाच धक्का बसल्याचे स्पष्ट दिसले. ५३ वर्षीय संजय कपूर यांचे लंडनमध्ये पोलो सामन्यादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूपूर्वीचा त्यांचा शेवटचा फोटो नुकताच समोर आला आहे. हा फोटो त्यांच्या पोलो संघाने पोस्ट केला असून त्यात संजय यांच्या चेहऱ्यावर हास्य आणि डोळ्यात एक वेगळीच चमक दिसते आहे. फोटोमध्ये संजय टीमची जर्सी घालून हसत मित्रासोबत फोटो काढताना दिसत आहेत.

संपूर्ण टीमने संजय यांना भावनिक श्रद्धांजली वाहिली आहे. संघाने सोशल मीडियावर लिहिले की, 'आज आपण प्रिय मित्र संजय कपूर यांच्या स्मरणार्थ कार्टियर ट्रॉफीचा अंतिम सामना खेळत आहोत. काही दिवसांपूर्वी मैदानावर त्यांचे दुखद निधन झाले. आमचे कर्णधार आणि मार्गदर्शक जयसल सिंग संजय त्यांच्या सन्मानार्थ एक मिनिट मौन पाळण्यासाठी संघात सामील होतील.'

संजय कपूर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना, ऑरियस पोलो क्लबनेही सोशल मीडिया पोस्टमध्ये श्रद्धांजली वाहिली. त्यामध्ये लिहिले होते, 'ऑरियस संघाला मोठा धक्का बसला आहे. संजय, तुम्ही ऑरियस संघाचा आत्मा होता. तुम्ही खरे प्रेरणास्थान होता. हा वारसा कायम राहील.' एकूणच संजय कपूर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन होण्याची बाब मान्य करणे, अनेकांना कठीण गेले. त्यांनी चुकून काहीतरी गिळले आणि त्यामुळे मृत्यू ओढावला, असे सांगण्यात येत आहे.

# गोंडस शुभेच्छा




प्रत्येक दिवस वडिलांसाठी आणि वडिलांमुळे असला तरी फादर्स डे खास पद्धतीने साजरा केला जातो. अलिकडेच तो आनंदाने साजरा झाला. या निमित्ताने अनेकांनी वडिलांवरील प्रेम व्यक्त केलेले दिसले. अभिनेत्री अनुष्का शर्मानेही सोशल मीडियावर एक खास नोट शेअर केली जी तिची मुलगी वामिकाने वडील विराट कोहलीसाठी लिहिली होती. यासोबतच अभिनेत्रीने सोशल मीडियावर स्वत:च्या वडिलांसोबतची एक झलक देखील शेअर केली.

हे दोन फोटो बरेच चर्चेत राहिले. पहिला फोटो अभिनेत्रीच्या वडिलांचा असून त्यात दोघे एका सेलिब्रेशनमध्ये दिसत आहेत. त्याच वेळी, दुसरा फोटो वामिकाच्या नोटचा आहे.

तिने फादर्स डे निमित्त विराट कोहलीसाठी काही लिहिलेला आहे. वामिकाची गोंडस सही नोटच्या खाली आहे. चिठ्ठीत लिहिले आहे की,

**तो माझ्या भावासारखा दिसतो**
**तो खूप मजेदार आहे**
**मला गुदगुल्या करतो**
**मी त्याच्यासोबत खेळते**
**मी त्याच्यावर खूप प्रेम करते**
**तो माझ्यावर खूप प्रेम करतो**
**फादर्स डे च्या शुभेच्छा**
**....वामिका...!**

हे फोटो शेअर करताना अनुष्काने लिहिले, 'मी ज्या पहिल्या माणसावर प्रेम केले आणि ज्या पहिल्या माणसावर आमची मुलगी प्रेम करते... जगभरातील सर्व सुंदर वडिलांना फादर्स डे च्या शुभेच्छा..' अनुष्का शर्माची ही पोस्ट सोशल मीडियावर खूप व्हायरल होत असून चाहत्यांना ती खूप आवडली आहे.

चाहत्यांनी अनुष्का शर्माला शाहरुख खानसोबत 'झिरो' मध्ये शेवटचे पाहिले आहे. मात्र लवकरच ती 'चकदा एक्सप्रेस' मध्ये दिसणार आहे.

# 'समसारा'चा वेगळा अंदाज



अत्यंत वेगळ्या धाटणीच्या, दमदार स्टारकास्ट असणाऱ्या 'समसारा' ची सध्या बरीच चर्चा आहे. त्याचा अतिशय धीरगंभीर टीजर पोस्टर लाँच झाल्यापासून उत्सुकता वाढलेली दिसली. एकूणच 'समसारा' हा एक उल्लेखनीय चित्रपट ठरणार असल्याची आशा बाळगणे चुकीचे ठरणार नाही.

संचय प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'समसारा'ची निर्मिती पुष्कर योगेश गुप्ता यांनी केली असून, दिग्दर्शनाची जबाबदारी सागर लढे यांनी सांभाळली आहे. कथा सागर लढे, विश्वेश वैद्य आणि समीर मानेकर यांची असून, पटकथा सागर लढे आणि समीर मानेकर यांनी लिहिली आहे. समीर मानेकर, निहार भावे यांनी संवादलेखन केलं आहे. विश्वेश वैद्य यांनी संगीत, अक्षय राणे छायांकनाची जबाबदारी निभावत आहेत. सायली संजीव, ऋषी सक्सेना, पुष्कर श्रोत्री, डॉ गिरीश ओक, नंदिता धुरी, प्रियदर्शनी इंदलकर, तनिष्का विशे, यशराज डिंबळे, कैलास वाघमारे, साक्षी गांधी अशी उत्तम स्टारकास्ट त्यात आहे.

'समसारा'ची कथा पौराणिक कथांशी जोडलेली असून ती देव आणि असुरांमधील युद्धावर आधारित आहे. एका असुराला भानवीच्या जुळ्या बहिणींचा नाश करायचा असतो. यामुळे देव आणि असुरांमध्ये युद्ध सुरू होते. चित्रपटात मृत्यूची देवता यम आणि जीवनाची देवी यमी यांची कथा देखील दाखवण्यात आली आहे.

'देव, दानव, असुर, मानव यांच्यातला एक पडला तरी दुसरा उभा राहतो. हे चक्र सुरू राहतं. पण हे चक्र थांबवायला काळ स्वत: जागा होतोय. आम्ही येतोय....' असे शब्द धीरगंभीर आवाजात ऐकू येतात आणि त्यातून 'समसारा' चं पोस्टर समोर येतं. हे अत्यंत कल्पक पोस्टर असलं तरी त्यातून कथानकाचा नेमका अंदाज बांधता येत नाही. 'काहे दिया परदेस' नंतर 'सम सारा' हा ऋषी सक्सेना आणि सायली संजीव यांचा पहिला मोठा प्रोजेक्ट आहे. यापूर्वी दोघांनीही एका म्युझिक व्हिडीओमध्ये एकत्र काम केलं आहे. ते 'लाजिरा' या हिट सिंगल ट्रॅकच्या म्युझिक व्हिडीओमध्ये एकत्र दिसले होते. या गाण्यात ऋषी सक्सेना पारंपरिक लूकमध्ये दिसला होता.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11